



Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

दैनिक **युवावार्ता**
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2026-28
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २४८। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | बुधवार १४/१०/२०२६ । पाने- ६







# पेपरफुटीचा बाजार! आयोगापासून कोचिंग क्लासपर्यंत संशयाची साखळी?

## आरोग्य विभाग, टीईटी, म्हाडा, बारावी आणि एमपीएससीतील गैरप्रकार

## विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्यांचा पर्दाफाश कधी?




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पुस्तकांशी मैत्री करून, दिवस-रात्र अभ्यास करून, घरची आर्थिक परिस्थिती बाजूला ठेवून सरकारी नोकरीचे स्वप्न पाहणाऱ्या लाखो तरुणांसाठी परीक्षा म्हणजे भविष्याचा दरवाजा. पण त्या दरवाजाची किल्लीच पैसे, ओळखी आणि कथित 'सेटिंग'च्या हातात गेली तर? परीक्षेपूर्वी प्रश्नपत्रिका मिळत असल्याचा आरोप, परीक्षा झाल्यानंतर गुणांमध्ये फेरफार, बनावट उमेदवारांमार्फत परीक्षा आणि निकालात कथित गडबड-महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत उघड झालेल्या विविध प्रकरणांनी भरती व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

सध्या एमपीएससीच्या औषध निरीक्षक भरती परीक्षेतील कथित पेपरफुटीमुळे राज्यात मोठा वाद निर्माण झाला आहे. या प्रकरणात आयोगातील अधिकारी, खासगी कोचिंग क्लासचा संचालक आणि इतर व्यक्तींना अटक झाल्याचे वृत्त आहे. त्याआधीही आरोग्य विभागाच्या भरती परीक्षा, शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) आणि म्हाडा भरतीतील कथित गैरव्यवहारांच्या तपासात सरकारी अधिकारी, मध्यस्थ आणि खासगी संस्थांशी संबंधित व्यक्तींची नावे समोर आली होती. त्यामुळे प्रश्न केवळ एका परीक्षेचा राहिलेला नाही; परीक्षा घेणारी यंत्रणा, प्रश्नपत्रिका हाताळणारे लोक आणि निवडीचा फायदा मिळवून देण्याचे आश्वासन देणारे घटक यांच्यातील संभाव्य साखळी नेमकी किती खोलवर आहे? हा आता अधिक महत्त्वाचा प्रश्न बनला आहे.

(पान ४ वर)

युवावार्ता पंचनामा






### एमपीएससी औषध निरीक्षक पेपरफुटी प्रकरण

एमपीएससी औषध निरीक्षक भरती परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणात आयोगातील अधिकारी, खासगी कोचिंग अकॅडमीचे संचालक, मध्यस्थ आणि उमेदवारांची नावे तपासासंदर्भातील वृत्तांत समोर आली आहेत. यामध्ये विश्वेश्वर दत्तात्रय नकाते, गोपाळ भट्टू मराठे, अभिजित गणपतराव लेंडवे, प्रवीण दिलीप पाटील, अमृत नामदेव पाटील, लोकेश ऊर्फ गौरव राजेंद्र पाटील, ऋतुजा पाटील, मयूर ठाकरे, साजिद संदे, विजय किंगर, संदीप खलाटे आणि भैरवनाथ कदम यांचा समावेश आहे. संबंधितांची भूमिका आणि त्यांच्यावरील आरोप तपास व न्यायालयीन प्रक्रियेत निश्चित होणे आवश्यक आहे.

### आरोग्य विभाग भरती पेपरफुटी प्रकरण

राज्यातील आरोग्य विभागाच्या २०२१ मधील भरती परीक्षेतील कथित पेपरफुटी आणि गैरव्यवहार प्रकरणात विविध व्यक्तींची नावे समोर आली होती. यामध्ये विजय मुऱ्हाडे, डॉ. महेश बोटले, प्रशांत बडगिरे, डॉ. संदीप जोगदंड, श्याम मस्के, संदीप भुतेकर, संजय सानप आणि अतुल राख ऊर्फ राक यांची नावे संबंधित वृत्तांत नमूद करण्यात आली होती. या प्रकरणामुळे भरती प्रक्रियेतील प्रश्नपत्रिकांची गोपनीयता आणि परीक्षा व्यवस्थेच्या सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित झाले होते.

### टीईटी व म्हाडा भरती गैरव्यवहार प्रकरण

शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) आणि म्हाडा भरतीतील कथित गैरव्यवहारांच्या तपासासंदर्भात तत्कालीन परीक्षा परिषद आयुक्त तुकाराम सुपे, आयएएस अधिकारी सुशील खोडवेकर, अश्विनी कुमार, प्रितेश देशमुख, संतोष हर्कळ, अंकुश हर्कळ, कृष्णा जाधव, अंकित चनखोरे, जमाल पठाण, कलीम गुलसर खान, मुकुंद सूर्यवंशी आणि अभिषेक सावरिकर यांची नावे विविध वृत्तांत प्रसिद्ध झाली होती. या प्रकरणांमुळे परीक्षा घेणाऱ्या यंत्रणा, खासगी संस्थांची भूमिका आणि भरती प्रक्रियेतील पारदर्शकतेचा मुद्दा ऐरणीवर आला होता.






# अघोरी पूजेच्या नावाखाली पैशांच्या पावसाचे आमिष!

## महिलेच्या धाडसामुळे भोंदूगिरीचा पर्दाफाश; सहा जणांविरुद्ध गुन्हा



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले : अघोरी पूजा करून पैशांचा पाऊस पाडण्याचे आमिष दाखवत एका महिलेची दिशाभूल करण्याचा धक्कादायक प्रकार अकोले तालुक्यात उघडकीस आला आहे. पूजेच्या नावाखाली महिलेला जाळ्यात ओढून तिच्यावर अनैतिक संबंधांसाठी दबाव आणण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप आहे. मात्र, संबंधित महिलेने प्रसंगावधान राखत या प्रकाराला विरोध केला आणि धाडसाने पोलिसांत धाव घेतली. तिच्या फिर्यादीवरून राजूर पोलिसांनी भोंदूसह सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

राजूर परिसरातील एका गावात ही घटना घडली. संबंधित महिला घरी एकटी असताना तिच्या ओळखीच्या दोन महिला तिच्याकडे आल्या. साड्या पाहण्यासाठी चल, असे सांगत त्यांनी तिला स्वतःच्या घरी नेले. तेथे आधीच चार जण उपस्थित होते. त्यातील एका व्यक्तीने महिलेची उंची मोजली, तसेच तिला अश्लील स्वरूपाचे प्रश्न विचारत तिच्या कुटुंबाविषयी खासगी माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे महिला घाबरली आणि तेथून निघून जाण्याचा प्रयत्न करू लागली. मात्र, सोबत आलेल्या ओळखीच्या महिलांनी तिची समजूत काढण्यास सुरुवात केली. नवीन साडी आणि पाच तोळे सोन्याचे दागिने देण्याचे आमिष दाखवण्यात आले. पुढील पंधरवड्यात विशेष पूजा करण्यात येणार असून, त्यासाठी महिलेला एका रिंगणात बसवले जाईल, असे तिला सांगण्यात आले.

या पूजेदरम्यान अदृश्य शक्ती प्राप्त होईल, असा दावा करत उपस्थित पाच जणांपैकी एकाची निवड करून त्याच्याशी शारीरिक संबंध ठेवण्यास सांगितले. जितका अधिक वेळ संबंध ठेवले जातील, तितका अधिक पैशांचा पाऊस पडेल, असे आमिष दाखवण्यात आल्याचे महिलेने फिर्यादीत नमूद केले आहे. पूजेच्या नावाखाली महिलेला अशा प्रकारे जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न झाल्याने या प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे.

(पान ४ वर)











Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा

- अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
- माफक दरात - संगमनेर येथेच
- 105 बेड्स
- तज्ञ डॉक्टर्स
- अत्याधुनिक सुविधा

कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध

हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग

सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33

पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना

9953299532 24/7 Emergency Services

आजच संपर्क करा

# विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क घेऊ नका

## मंत्री चंद्रकांत पाटलांचे विद्यापीठांना कडक निर्देश




युवावार्ता (प्रतिनिधी)

राज्यातील ३४ जिल्ह्यांमधील २६५ तालुक्यांत दुष्काळी परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित भागातील विद्यार्थ्यांना मोठा आर्थिक दिलासा देण्यासाठी त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे परीक्षा शुल्क आकारण्यात येऊ नये, असे स्पष्ट निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत. शासनाच्या या निर्देशांचे उल्लंघन करून विद्यार्थ्यांकडून शुल्क वसूल करणाऱ्या महाविद्यालयांवर कठोर कारवाईचा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

मराठवाडा आणि राज्यातील इतर दुष्काळी भागांमधील शेतकरी व सर्वसामान्य कुटुंबांना सध्या गंभीर आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा कठीण परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर आणि कुटुंबांवर आर्थिक ताण येऊ नये, यासाठी शासनाने घेतलेल्या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. विद्यापीठ प्रशासनाने याची गांभीर्याने नोंद घ्यावी आणि विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क वसूल केले जाणार नाही, याची पूर्ण दक्षता घ्यावी, अशा सक्त सूचना बैठकीत देण्यात आल्या.

# श्रमिक विडी कामगारांचे विविध मागण्यांसाठी आंदोलन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुक्यातील श्रमिक विडी औद्योगिक सहकारी संस्थेच्या विडी कामगारांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलन सुरू केले आहे. कामगारांच्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी येथील प्रांत कार्यालय परिसरात फलक लावून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.

विडी कामगारांना मिळणाऱ्या मजुरीतून नियमानुसार ५ टक्के घरभाडे भत्ता देण्यात यावा, तसेच किमान वेतनाच्या दरानुसार कामाचा योग्य मोबदला मिळावा, अशी मागणी कामगारांनी केली आहे. याशिवाय कामगारांच्या बोनस, ग्रॅच्युईटी आणि इतर आर्थिक लाभांबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

कामगारांच्या म्हणण्यानुसार, सहकारी संस्थेच्या व्यवस्थापनाकडून कामगार कायद्यांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप करण्यात येत असून, संबंधित बाबींची चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. कामगारांना त्यांच्या हक्काचे आर्थिक लाभ वेळेत मिळावेत आणि प्रलंबित प्रश्नांवर तातडीने निर्णय घ्यावा, यासाठी आंदोलनाच्या माध्यमातून आवाज उठवण्यात येत आहे.

संबंधित प्रशासन व संस्थेच्या व्यवस्थापनाने कामगारांच्या मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन त्यावर तातडीने तोडगा काढावा, अशी अपेक्षा आंदोलनकर्त्या कामगारांनी व्यक्त केली आहे. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सचिन साळुंके, सचिव संजय देशमुख, भानुदास मुरलीधर आवरे यांच्यासह कामगार महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# अकोल्यातील धरणांच्या पाण्याचे काटेकोर नियोजन करा

## निळवंडेतील पाण्याची उधळपट्टी थांबविण्याची शिवसेनाची मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - तालुक्यात दुष्काळाचे सावट गडद होत असताना भंडारदरा, निळवंडे, आढळा, पिंपळगाव खांड व सांगवी-अंबित या धरणांतील पाण्याचे काटेकोर नियोजन करावे, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने केली आहे. यासंदर्भात जिल्हाप्रमुख जगदीश चौधरी व तालुकाप्रमुख महेशराव रमेश नवले यांनी तहसीलदारांना निवेदन दिले.

निळवंडे धरणातून प्रवरा नदीपात्रात गेल्या २५ दिवसांपासून सुरू असलेल्या आवर्तनामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी खर्च होत असल्याचा दावा करत, एका आवर्तनात सुमारे तीन टीएमसी पाणी खर्च होणे थांबवावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तसेच अकोले तालुक्याला उच्चस्तरीय बंधिस्त पाइपलाइनद्वारे मिळणाऱ्या २७४ एमएफस्टी पाण्याचे नियोजन, आढळा धरणातील पाण्याचे शेती व पिण्यासाठी स्वतंत्र नियोजन आणि पिंपळगाव खांड धरणाच्या आवर्तनाबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करावी, असेही म्हटले आहे. तालुक्यातील जनतेचा उपलब्ध पाणीसाठ्यावरील हक्क अबाधित ठेवून पाण्याचे योग्य व्यवस्थापन करावे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर चारा छावण्या सुरू करणे, शेतकऱ्यांची कर्जमाफी आणि महिला बचत गटांना कर्जमाफी देण्याबाबत गांभीर्याने विचार करावा, अशी मागणीही शिवसेनेने केली आहे.

# सीजेपीचे दास, रांका ताब्यात

नवी दिल्ली -

दिल्ली पोलिसांनी मंगळवारी 'कॉकरोच जनता पार्टी'चे प्रवक्ते सौरव दास आणि आशुतोष रांका यांना ताब्यात घेतले. या दोघांनी उगझ च्या समर्थकांसह जंतर-मंतरवर जात घोषणाबाजी केली होती. त्यानंतर पोलिसांनी सर्वांना ताब्यात घेतले. या घटनाक्रमानंतर सीजेपी ने ताब्यात घेतलेल्या नेत्यांचा एक व्हिडिओ जारी केला. त्यात रांका म्हणाले, ज्ञानेश कुमार राजीनामा देत नाहीत तोपर्यंत जंतर-मंतरवर आंदोलन सुरूच राहील. आज दहा जण आलेत. उद्या १,००० जण येतील, परवा १०,००० जण येतील. आता जंतर-मंतरवर आंदोलने करता येणार नाहीत. केंद्र सरकारने सोमवारी या ठिकाणाला आंदोलनासाठी निश्चित केलेल्या ठिकाणांच्या यादीतून वगळले.

# विरोधकांच्या याचिकेत त्रुटी

नवी दिल्ली -

सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रीने राहुल गांधी, अखिलेश यादव, तेजस्वी यादव यांच्यासह ११ विरोधी नेत्यांनी दाखल केलेल्या याचिकेत तब्बल १४ त्रुटी असल्याचे स्पष्ट केले आहे. ही याचिका मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकनात मोठ्या प्रमाणावर नावे वगळणे आणि गैरप्रकार केल्याच्या आरोपांशी संबंधित आहे. वृत्तसंस्था पीटीआयनुसार, रजिस्ट्रीने याचिका दाखल करणाऱ्या वकिलांकडे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या ओळखपत्राची स्पष्ट प्रत मागितली.

# डॉ. विनायक बैरागी यांचा जागतिक स्तरावरील टॉप २% शास्त्रज्ञांमध्ये समावेश



संगमनेर : ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटीच्या कॉलेज ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीमधील प्राध्यापक व संशोधक डॉ. विनायक बैरागी यांचा जगातील टॉप २% शास्त्रज्ञांच्या यादीत समावेश झाला आहे. स्टॅनफोर्ड विद्यापीठ आणि एल्सेव्हियर यांच्या वतीने ७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या या यादीत त्यांना स्थान मिळाले आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि इमेज प्रोसेसिंग क्षेत्रात गेल्या १३ वर्षांपासून संशोधन करणाऱ्या डॉ. बैरागी यांच्या कार्याचा हा गौरव आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे प्राचार्य डॉ. पी. बी. माने आणि सचिव मालोजीराजे छत्रपती यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# SIR यादीवर दावे- हरकती दाखल करण्यास मुदतवाढ, केंद्रीय निवडणूक आयोगाचा निर्णय



मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रामध्ये राबवण्यात येत असलेल्या मतदार यादीच्या विशेष पुनरीक्षण कार्यक्रमाला अर्थात डखठ यादीला पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत जर नागरिकांचे प्रारूप मतदार यादीमध्ये नाव नसेल अशा नवमतदारांना आपलं नाव मतदार यादीमध्ये नोंदवण्यासाठी मुदतवाढ मिळाली आहे. जरीही दावे आणि हरकती दाखल करण्यासाठी निवडणूक आयोगाने मुदतवाढ दिली असली तरीही मात्र अंतिम मतदार यादी मात्र पूर्वीच्या वेळापत्रकाप्रमाणेच प्रसिद्ध केली जाणार आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या मुदतवाढीमुळे नवीन मतदारांना मोठा दिलासा मिळाला आहे.महाराष्ट्रातील मतदारांना पाठवण्यात आलेल्या नोटिसींना उत्तर देण्यासाठी आणि डखठ यादीमध्ये नाव नोंदणी करण्यासाठी २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. हीच मुदत पूर्वी १२ ऑक्टोबरपर्यंत होती. निवडणूक आयोगाने दिलेल्या मुदतवाढीमुळे नवीन मतदारांना दिलासा मिळाला आहे. राज्यामध्ये १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीच्या विशेष पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीसाठी दावे व हरकती सादर करण्याच्या मुदतीत भारत निवडणूक आयोगाने पुन्हा वाढ केली आहे. परंतु, अंतिम मतदार यादी मात्र पूर्वीच्या वेळापत्रकानुसार म्हणजेच, १६ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.भारत निवडणूक आयोगाच्या सुधारित वेळापत्रकानुसार, दावे आणि हरकती सादर करण्याचा कालावधी ३१ ऑगस्ट ते २६ ऑक्टोबर २०२६ असा राहील. शिवाय, नोटीस टप्पा आणि दावे व हरकती निकाली काढण्याची प्रक्रिया ३१ ऑगस्ट ते १० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यानंतर अंतिम मतदार यादी मात्र पूर्वीच्या वेळापत्रकानुसार १६ नोव्हेंबर २०२६ रोजी म्हणजेच दिवाळीनंतर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. मतदार यादीत नाव समाविष्ट करणे, नोंदींमध्ये दुरुस्ती करणे तसेच आवश्यकतेनुसार हरकती दाखल करण्यासाठी ही मुदतवाढ महत्त्वाची आहे. त्यामुळे पात्र नागरिकांनी तसेच नवमतदारांनी या वाढीव मुदतीचा लाभ घ्यावा असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने केले आहे.

# जागतिक हात धुवा दिनानिमित्त जिल्ह्यात जनजागृतीपर उपक्रम राबविण्याचे आवाहन



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- जागतिक हात धुवा दिनानिमित्त १५ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, शाळा व अंगणवाड्यांमध्ये विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्याचे आवाहन जिल्हा परिषद अहिल्यानगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले आहे.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस जागतिक हात धुवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून वैयक्तिक स्वच्छता, हात धुण्याचे महत्त्व आणि स्वच्छतेच्या सवयींबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना हात धुण्याची योग्य पद्धत, हात धुण्याचे फायदे आणि स्वच्छतेचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांकडून हात धुण्याचे प्रात्यक्षिक करून घेणे, ग्रामस्तरावर जनजागृती करणे, समुदाय बैठका आयोजित करणे आणि शाळांमध्ये जनजागृती रॅली काढणे यांसारखे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या कार्यक्रमांचे नियोजन गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी आणि बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी आपापल्या स्तरावर करावे. राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा सचित्र अहवाल १९ ऑक्टोबर २०२६ पर्यंत जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या संबंधित कार्यालयास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. स्वच्छतेच्या चांगल्या सवयी अंगीकारून निरोगी समाजाच्या निर्मितीसाठी जागतिक हात धुवा दिनानिमित्त जिल्ह्यात व्यापक जनजागृती करण्याचे आवाहन राजेंद्र देसले प्रकल्प संचालक जलजीवन यांनी केले आहे

# सणासुदीत भेसळखोरांवर एफडीएचा बडगा




## अनेक आस्थापनांवर कारवाई

मुंबई (वृत्तसंस्था)

सणासुदीच्या कालावधीत नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या घटकांवर चाप बसवण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने राज्यभर धडक मोहीम हाती घेतली आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मोहीम राबवण्यात येत असून, यादरम्यान राज्यभरातून कोटी रुपयांचा प्रतिबंधित आणि दर्जाहीन अन्नसाठा जप्त करण्यात आला आहे. या मोहिमेअंतर्गत अनेक जणांवर गुन्हे दाखल करून अटक करण्यात आली असून काही बड्या आस्थापनांचे परवानेही तात्काळ निलंबित करण्यात आले आहेत.

पालघर विभागात अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई करत प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखूची अवैध वाहतूक करणारा एक ट्रक पकडला. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी मनोर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर ही कारवाई करण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनातून विक्रीच्या उद्देशाने नेण्यात येणारा ११ कोटी ३० लाख रुपयांपेक्षा अधिक किमतीचा प्रतिबंधित साठा आणि १ कोटी २० लाख रुपयांचे वाहन, असा एकूण ९ कोटी १५ लाखांहून अधिक मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी वाहनचालक, क्लीनरसह ६ जणांविरुद्ध मनोर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेसह अन्न सुरक्षा कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुंबईत अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई करत मालाडमधील 'मे. क्रिष्णम रिटेल्स एलएलपी (ब्रिजवासी)' आणि भांडुप येथील 'मे. झेप्टो लिमिटेड' यांच्यावर कारवाईचा बडगा उगारला आहे. सार्वजनिक आरोग्यास गंभीर धोका निर्माण करणाऱ्या त्रुटी आढळल्यामुळे आणि अन्न सुरक्षेच्या नियमांचे गंभीर उल्लंघन केल्याप्रकरणी या दोन्ही आस्थापनांचे **FSSAI** परवाने तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहेत.

तळोजा येथे दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या उत्पादन व साठवणूक केंद्रांवर धडक तपासणी करण्यात आली. मे. सावरिया मिल्क अँड मिल्क प्रॉडक्ट्स येथे वैध परवान्याशिवाय दूध साठवणूक करणे, बिले नसणे आणि म्हशीच्या दुधात स्किम्ड मिल्क मिसळल्याच्या संशयावरून ५ हजार ३९४ लिटर दूध जागेवर नष्ट करण्यात आले. तसेच मे. महेश्वरी फोर्ड्स येथे पनीर उत्पादन कक्षात पाल आढळल्याने आणि अत्यंत अस्वच्छता असल्यामुळे ११९ किलो लो-फॅट पनीर नष्ट करण्यात आले. या कारवाईत एकूण सुमारे ३ लाख ८८ हजार रुपयांपेक्षा जास्त किमतीचा दुग्धजन्य साठा नष्ट करण्यात आला असून ३ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूरमध्ये कारवाई पुणे विभागात खाद्यतेलाची धडक तपासणी करण्यात आली असून, ९ हजार ६७५ किलो वजनाचा आणि सुमारे १ कोटी २१ लाखांहून अधिक किमतीचा संशयित व दर्जाहीन खाद्यतेल साठा जप्त करण्यात आला आहे. तसेच पुणे विभागात ७ हॉटेल आणि ढाब्यांवर कारवाई करण्यात आली असून, विनापरवाना व्यवसाय करणाऱ्या ४ आस्थापनांना व्यवसाय बंद करण्याचे निर्देश देण्यात आले.

Seva Sanskar Sanstha's
**Shramshakti College of Food Technology, Maldad.**
Tal- Sangamner,Dist-Ahilyanagar- 422608
(Affiliated to Mahatma Phule Krishi Vidyapeeth,Rahuri)

**APPOINTMENTS**

Applications are invited from the eligible candidates for recruitment of the posts as under.

| Sr. NO | Subject/Discipline | No.of post | Qualification |
|---|---|---|---|
| 1 | Principal | 1 | 1 Ph.D.in respective faculty Minimum fifteen year experience in the field of teaching or research or extension education, out of which at least three years experience as Head of Department. Or Minimum fifteen years exprience in the field of which at least five years experience shall be in the cadre of regular Professor of its equivalent.<br>2 Experience of guiding at least five post graduate students.<br>3 Evidence of at least ten published papers in peer reviewed or UGC listed Academy of Agricultural Science rating (NAAS) rated journals.<br>4 A minimum of 110 Academic/Research score as per Appeendix II, Table 2A. |
| 2 | Assistant Professor | | 1 Ph. D.or Master's degree in relevant field/subject or equivalent along with NET/SLET/SET prescribed by the UGC/ ICAR<br>2 Two your experience in Research/ Teaching/Extension Education.<br>3 Evidence of Published papers (minimum two) in recognized journals having ISSN Number.<br>4 The short note/ short communication will not be considered. |
| | 1 Food process Technology | 1 | |
| | 2 Food Safety and Quality Assurace | 1 | |
| | 3 Food Process Engineering | 1 | |
| | 4 Food Business Management | 1 | |
| | 5 Food Plant Operations | 2 | |

Mandatory-Email your resume along with all necessary document in PDF format to shramshaktimaldad99@gmail.com whithin 5 days from the date of advertisement.
The vacancies may increase/decrease. The positions are likely to be regularized in due course of time upon appropriate approvals. The eligibility,qualification & experience are as per MPKV, Rahuri norms. The proforma application form along with photo copy of all relevant documents must be submitted at the time of interview.

**Secretary/-**
**Seva Sanskar Sanstha, Sangamner**

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!



राजहंस

दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ

संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.

अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर

(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२

www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



संगमनेरकरांनी गौरविलेले

।।जय श्रीराम।।

सुपर शॉपी

निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक

जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर

एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्

प्रोप्रा. अशोक रा. जाधव

फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२

क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४

डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध

या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा

संपर्क

८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४

७६२०३८८२३०






४

नवरात्री नऊ दुर्गा

माता कूष्मांडा

माता कूष्मांडा या नवरात्रीच्या चौथ्या दिवशी पूजल्या जाणाऱ्या आदिशक्तीच्या नवदुर्गा स्वरुपातील चौथी देवी आहेत, आपल्या सौम्य आणि हलक्या स्मितहास्याने त्यांनी संपुर्ण ब्रम्हांड निर्माण केले,अशी धार्मिक मान्यता आहे.
माता कूष्मांडा ब्रह्माडाची रचना केली म्हणून माता कूष्मांडा सृष्टीची रचयीता मानले जाते.

## कूष्मांडा देवीची ओळख

नाव आणि जन्म :-देवी कूष्मांडा यांचा पारंपारिक अर्थाने मानवासारखा जन्म झालेला नाही, तर त्या स्वयंभू आणि सृष्टीच्या उत्पतीचे कारण आहेत.

आवतारचे महत्व :- ती देवी दुर्गेचा चौथा आवतार असून, नावरात्रीच्या चौथ्या दिवशी तिची पूजा केली जात

रूप :- सिद्धीदात्री आणि पार्वती रुप
सर्वोच्य देवी आदि पराशक्ती भगवान शिव यांच्या डाव्या भागातून सिध्दिदात्रीच्या रूपात प्रकट झाल्या.
त्यानंतर त्यांनी सुर्यमंडळाच्या मध्यभागी निवास करण्यास सुरुवात केली.
सुर्याच्या केंद्रस्थानी राहून विश्वाला उर्जा देणाऱ्या या रूपाला कूष्माडा नाव मिळाले

स्वरूप :-माता कूष्मांडा या सिंहारूढ असून त्यांना आठ भुजा आहे त्यांच्या हातामध्ये कमंडलू, धनुष्य, बाण, कमळ,अमृत कलश, चक्र, गदा, आणि सर्व सिद्धी देणारी जपमाळ आहे.

# बिनविरोधसाठी इच्छुकांची मनधरणी सुरू

## अनेकांकडून वाट पहाण्याचा सल्ला



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी अर्ज भरलेल्यांना २१ तारीख ही मागे घेण्यासाठीची अंतिम तारीख आहे. त्यामुळे नवरात्रोत्सवाच्या काळात नेते संबंधितांच्या घरी चकरा मारू लागले आहेत. जागा बिनविरोध होण्यासाठी मनधरणी सुरू आहे. आज बिगरशेती मतदारसंघातून रावसाहेब रोहोकले यांनी माघार घेतल्याने माघारीचा 'श्री गणेशा' झाला आहे. अनेक जण 'वेट अ‍ॅण्ड सी'च्या भूमिकेत आहेत.

जिल्हा बँकेच्या २१ जागांसाठी मतदान होणार आहे. निवडणूक बिनविरोध होण्यासाठी विखे-थोरात

यांनी मोट बांधली. तशी बैठकही संगमनेरला झाली. तथापि, त्याचा परिणाम म्हणून अधिक अर्ज भरण्यात आले. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी प्रारंभी रिंगणात उतरण्याची तयारी केली; परंतु ऐनवेळी माघार घेऊन बँकेच्या राजकारणातून जणू एक्झिट घेतली. खासदार नीलेश लंके यांनी मात्र स्वतःचा अर्ज भरत स्वतंत्र पॅनेल बनविण्याची तयारी केली. त्यांना इतर उमेदवारांनीही साथ दिली. साहजिकच इच्छुकांचे सर्व जागा बिनविरोधचे स्वप्न धुळीस मिळाले. असे असले, तरी चार जागा बिनविरोध झाल्या आहेत. केवळ औपचारिकता बाकी आहे. इतरही काही जागा बिनविरोधच्या मार्गावर आहेत. थोड्या जागांसाठी लढत होण्याची शक्यता आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी बहुतेक सदस्यांची इच्छा असली, तरी सर्वसामान्य शेतकऱ्यांचे नेतृत्व करणाऱ्यांनाही न्याय हवा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. केवळ कारखानदारांच्याच ताब्यात बँक जाऊ नये, शेतकऱ्यांनाही बँकेच्या माध्यमातून आधार मिळावा, यासाठी काही नेत्यांनी दंड थोपटले आहेत.

अर्ज मागे घेताना अनेक जण जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीला उमेदवारी देण्याचा शब्द पक्षाकडून घेणार आहेत. काहींना नेत्यांनी फोन करावा, असा हट्ट धरला आहे, तर काहींना 'प्रसाद' हवा असल्याची चर्चा आहे. त्यामुळे अर्ज मागे घेताना सर्वांची इच्छापूर्ती करताना संबंधित नेत्यांची दमछाक होत आहे.

# संगमनेर आगारात आणखी पाच इलेक्ट्रिक शिवाई बसेस दाखल!



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर आगारासाठी मंजूर करण्यात आलेल्या २५ इलेक्ट्रिक शिवाई एसटी बसेसपैकी पहिल्या सहा बसेस गुरुवारी (ता. ८) संगमनेरमध्ये दाखल झाल्या होत्या. या बसेसचे आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. त्यानंतर आता आणखी पाच इलेक्ट्रिक शिवाई बसेस संगमनेर आगारात दाखल झाल्या आहेत. त्यामुळे आगारातील इलेक्ट्रिक बसेसची संख्या ११ झाली असून, या बसेस जिल्ह्यांतर्गत विविध मार्गांवर धावणार आहेत.

आगाराला आधुनिक आणि पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक एसटी बसेस उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केली होती. या मागणीची दखल घेत परिवहन विभागाकडून संगमनेर आगारासाठी २५ इलेक्ट्रिक शिवाई बसेस मंजूर करण्यात आल्या होत्या. त्यानुसार पहिल्या टप्प्यात सहा बसेस संगमनेरमध्ये दाखल झाल्या. त्यांचे आमदार खताळ यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले होते. आता त्यापाठोपाठ आणखी पाच बसेस आगारात दाखल झाल्याने इलेक्ट्रिक बससेवेचा विस्तार होण्यास मदत होणार आहे.

पहिल्या टप्प्यात दाखल झालेल्या बसेस पुणे, पंढरपूर आणि तुळजापूर या मार्गांवर पाठविण्यात येत आहेत. नव्याने दाखल झालेल्या पाच बसेस जिल्ह्यांतर्गत मार्गांवर चालविण्यात येणार आहेत. त्यामुळे प्रवाशांना आरामदायी आणि पर्यावरणपूरक प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. इलेक्ट्रिक शिवाई बसेसमुळे इंधनावरील खर्च कमी होण्यासह वायुप्रदूषण कमी करण्यासही मदत होणार आहे. संगमनेर आगारासाठी मंजूर झालेल्या उर्वरित बसेस टप्प्याटप्प्याने दाखल झाल्यानंतर प्रवाशांना आधुनिक बससेवेचा अधिक लाभ मिळणार आहे.

# ललितापंचमीनिमित्त कुंकुमार्चन सोहळा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येत्या गुरूवारी दि. १५ ऑक्टोबर रोजी ललितापंचमीच्या औचीत्यास अनुसरून पुरोहित प्रतिष्ठान(संगमनेर पुरोहित संघ) च्या वतीने सर्व महिलांसाठी विनामुल्य कुंकुमार्चन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या पर्वणीचा महिलांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष भाऊ जाखडी यांनी पत्रकाद्वारे आले आहे.

मागील अनेक वर्षांपासून संगमनेर मध्ये होणारा कुंकुमार्चन सोहळा महिला वर्गामध्ये प्रचंड लोकप्रिय ठरला आहे. भक्ती शक्तीचे प्रतिक असलेल्या महालक्ष्मी, जगदंबा, दुर्गा, कालिका, शारदा, सरस्वती, रेणुका, सप्तशृंगी, अशा अष्ट देवींच्या कृपेचे प्रासादिक कुंकू या सोहळ्यात लाभत असल्याने ही महिलांसाठी मोठी पर्वणी असते.

अनेक वर्षांपासून श्रीशारदीय नवरात्रोत्सवानिमित्त पुरोहित प्रतिष्ठान (संगमनेर पुरोहित संघ) प्रतीवर्षी कुंकुमार्चन सोहळ्याचे आयोजन करीत असतो. यंदा या उपक्रमाचे चौदावे वर्ष आहे. हा सोहळा शुक्रवारी सव्वाचार वाजता मालपाणी लोन्सच्या सभागृहात संपन्न होणार आहे. सर्व महिलांना विनामुल्य सहभाग घेता येणार आहे. महिलांनी अन्नपूर्णा मूर्ती व श्रीयंत्र घेऊन पूजनास उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी ब्रह्मवृंदाच्या मार्गदर्शनाखाली वेदमंत्रांचा घोष आणि श्रीसूक्त पठण , महाआरती असे शात्रोक्त विधी केले जाणार आहेत. माता भगिनींसाठी फराळ, चहा पान अल्पोपहार यांची व्यवस्था करण्यात आली आहे.संगमनेर मधील सर्व माता भगिनींनी या सोहळ्याचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन निमंत्रक पुरोहित प्रतिष्ठान (संगमनेर पुरोहित संघ) यांनी केले आहे.

# 'एकलव्य' मवेशी शाळेची आदिवासी विद्यार्थिनी अश्विनी हिचा 'आठवणी' हा काव्यसंग्रह प्रकाशित



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूल, मवेशी येथील इयत्ता बारावीमध्ये शिकणाऱ्या आदिवासी विद्यार्थिनी अश्विनी वाघमारे हिचा 'आठवणी' हा स्वलिखित कवितासंग्रह क्राऊन पब्लिकेशन, छत्तीसगड यांच्या माध्यमातून नुकताच प्रकाशित झाला आहे. या काव्यसंग्रहाचे औपचारिक प्रकाशन सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६ रोजी एचठड मवेशी येथे मवेशी ग्रामपंचायतीचे सरपंच यमाजी भांगरे आणि शाळेचे प्राचार्य देवानंद थूल यांच्या हस्ते करण्यात आले.या प्रकाशन सोहळ्याला राजूर पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल संभाजी सांगळे, मवेशी गावातील सामाजिक कार्यकर्ते रामदास भांगरे व अनिल भांगरे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य किरण कोंडार उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते अश्विनी वाघमारे हिचा सत्कार करण्यात आला. तिच्या साहित्यिक यशाचे कौतुक करून मान्यवरांनी तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

'आठवणी' या काव्यसंग्रहामध्ये अश्विनीने आई, वडील, बहीण आणि मैत्रीण यांच्याविषयीच्या भावस्पर्शी आठवणींसह विविध सामाजिक विषयांवर कविता लिहिल्या आहेत. मुलीच्या जन्मासंदर्भातील सामाजिक दृष्टिकोन मांडणारी 'नकुशी', छत्रपती शिवाजी महाराजांवरील 'राजे' आणि राजमाता जिजाऊ यांच्यावरील 'जिजाऊ' या कविता विशेष उल्लेखनीय आहेत. या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनाबद्दल प्रकाशकांकडून अश्विनीला ५० हजार रुपये मानधन देण्यात आले असून, तिला ८८ टक्के रॉयल्टीदेखील देण्यात आली आहे. हा काव्यसंग्रह मेझॉन या ऑनलाइन विक्री मंचावर १०६ रुपये किमतीत उपलब्ध आहे.

अश्विनीच्या या यशामुळे ईएमआरएस मवेशी शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, तिच्या साहित्यिक प्रवासाचे सर्वत्र कौतुक होत आहे.


Seva Sanskar Sanstha's
**Shramshakti College of Agriculture, Maldad.**
Tal- Sangamner,Dist-Ahilyanagar-422608
(Affiliated to Mahatma Phule Krishi Vidyapeeth,Rahuri)

**APPOINTMENTS**

Application are invited from the eligible candidates for recruitment of the posts as under.

| Sr. NO | Subject/Discipline | No.of post | Qualification |
|---|---|---|---|
| 1 | Principal | 1 | 1 Ph.D.in respective faculty Minimum fifteen year experience in the field of teaching or research or extension education, out of which at least three years experience as Head of Department. Or Minimum fifteen years experience in the field of which at least five years experience shall be in the cadre of regular Professor of its equivalent. 2 Experience of guiding at least five post graduate students. 3 Evidence of at least ten published papers in peer reviewed or UGC listed Academy of Agricultural Science rating (NAAS) rated journals. 4 A minimum of 110 Academic/Research score as per Appeendix II, Table 2A. |
| 1 | Assistant Professor | | 1 Ph. D.or Master's degree in relevant field/subject or equivalent along with NET/SLET/SET prescribed by the UGC/ ICAR 2 Two your experience in Research/ Teaching/Extension Education. 3 Evidence of Published papers (minimum two) in recognized journals having ISSN Number. 4 The short note/ short communication will not be considered. |
| | 1 Agronomy | 1 | |
| | 2 Plant Pathology | 1 | |
| | 3 Soil Science | 1 | |
| | 4 Horticulture | 1 | |
| | 5 AHDS | 1 | |
| | 6 Agril.Extension | 1 | |
| | 7 Agril. Botany | 1 | |
| | 8 Agril.Entomology | 1 | |
| | 9 Agril.Engineering | 1 | |

Mandatory-Email your resume along with all necessary document in PDF format to shramshaktimaldad99@gmail.com whithin 5 days from the date of advertisement.
The vacancies may increase/decrease. The positions are likely to be regularized in due course of time upon appropriate approvals. The eligibility,qualification & experience are as per MPKV, Rahuri norms. The proforma application form along with photo copy of all relevant documents must be submitted at the time of interview.

**Secretary/-**
**Seva Sanskar Sanstha, Sangamner**


# भाऊसाहेब विठ्ठलराव विखे पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली

## अण्णांच्या आठवणी, मायेचा ओलावा आणि जपलेल्या नात्यांचा ठेवा!



आज अण्णा (कै. भाऊसाहेब विठ्ठलराव विखे पाटील) यांना श्रद्धांजली अर्पण करताना असंख्य आठवणी मनात दाटून आल्या. माझ्या विवाहानंतर त्यांचा अधिक जवळून सहवास लाभला. पांढरे शुभ्र धोतर-शर्ट, डोक्यावर टोपी, उंच आणि भारदस्त व्यक्तिमत्त्व आजही डोळ्यांसमोर उभे राहते.

आमच्या वाड्यात नारायणगिरी महाराज आल्यानंतर अण्णांचे दादांकडे(सासरे स्व.चंद्रभानदादा) नेहमी येणे-जाणे असे. जेवण केल्याशिवाय ते कधीच जात नसत. दादा गेल्यानंतरही प्रत्येक कौटुंबिक कार्यक्रमाला त्यांची आवर्जून उपस्थिती असे. त्यांचा सहवास आम्हाला नेहमीच आधार देणारा होता.

माझ्या मोठ्या जाऊ अरुंधतीताई या अण्णांच्या कन्या; पण त्यांनी आम्हाला स्वतःच्या मुलीसारखे प्रेम दिले. माझ्या मुलांचे नातवंडांप्रमाणे लाड केले. पुण्याला गेल्यावर अण्णा आणि नानी मुलांना आवर्जून बोलावून घेत, त्यांच्या जेवणाची आस्थेने चौकशी करत. त्यांची माया आणि आपुलकी कधीही विसरता येणार नाही.

आमच्या मोठ्या वहिनी अण्णांच्या विशेष लाडक्या होत्या. त्यांचे लाड करण्यात आणि हट्ट पुरवण्यात अण्णांना आनंद वाटत असे. जावई एकनाथ पाटील घोगरे हे देखील अण्णांपुढे नेहमी आदराने आणि नम्रतेने वागत. त्यामुळे वहिनींनाही अण्णांकडून आपले हट्ट पूर्ण करून घेण्याची संधी मिळत असे. म्हसोबाच्या यात्रेच्या पहिल्याच दिवशी आमच्या वाड्यात भेळ, जिलेबी आणि रेवड्यांचा खाऊ आवर्जून पाठवला जाई. या छोट्या गोष्टींतून त्यांचे आमच्यावरील प्रेम आणि जिव्हाळा दिसून येत असे.

गावातील धार्मिक कार्यात अण्णा नेहमी अग्रेसर असत. शेती आणि हिशोब ही त्यांची आवडीची कामे होती. त्यांच्या भारदस्त व्यक्तिमत्त्वाचा गावात एक वेगळाच दबदबा होता. बोलण्यातला ठामपणा, स्वभावातील दरारा आणि नाती जपण्याची वृत्ती यांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होता.

आज विक्रांत, विजय, विक्रम, स्मिता, गीता आणि मृण्मयी यांना अण्णांची उणीव नक्कीच जाणवत असेल. त्यांचा आधार, प्रेम आणि आदरयुक्त धाक यांची जागा कोणीही घेऊ शकणार नाही.

### ॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

अण्णा, तुम्ही आज आमच्यात नाहीत; पण तुमचे प्रेम, जपलेली नाती आणि असंख्य आठवणी आमच्या हृदयात सदैव जिवंत राहतील.

या दुःखातून सावरण्याची शक्ती संपूर्ण कुटुंबाला परमेश्वर देवो, हीच प्रार्थना.

कै. भाऊसाहेब विठ्ठलराव विखे पाटील (अण्णा) यांना घोगरे परिवाराकडून भावपूर्ण श्रद्धांजली!

**– प्रभावती जनार्दन घोगरे**

लोणी, ता. राहाता, जि. अ.नगर

# संपादकीय...

## महागाईचा चढता आलेख जगण्याचा संघर्ष तीव्र !

महागाई हा आज केवळ आर्थिक विषय राहिलेला नाही, तर तो सर्वसामान्य कुटुंबांच्या रोजच्या जगण्याचा प्रश्न बनला आहे. सकाळी घरातून बाहेर पडताना लागणारा चहा, नाश्ता, भाजीपाला, दूध, मुलांचे शिक्षण, औषधोपचार, वीजबिल आणि घरभाडे अशा प्रत्येक गोष्टीचा हिशेब करताना सामान्य माणसाची दमछाक होत आहे. महिन्याच्या सुरुवातीला हातात आलेला पगार महिनाअखेरीस पुरवणे हीच अनेक कुटुंबांसाठी मोठी कसरत बनली आहे. उत्पन्न वाढण्याचा वेग मर्यादित असताना खर्च मात्र सतत वाढत असल्याची भावना समाजात तीव्र होत आहे. अशा परिस्थितीत महागाईच्या या वाढत्या ओझ्याखाली दबलेल्या सामान्य नागरिकांच्या खिशाला आधार देणार कोण, हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. महागाईची झळ सर्वांनाच बसते; मात्र तिचा परिणाम प्रत्येकाच्या आर्थिक परिस्थितीनुसार वेगवेगळा असतो. मोठे उत्पन्न असलेल्या कुटुंबांना वाढत्या खर्चाशी जुळवून घेणे काही प्रमाणात शक्य होते. परंतु रोजंदारीवर काम करणारे मजूर, अल्प उत्पन्न गटातील कुटुंबे, छोटे व्यावसायिक, शेतमजूर आणि मर्यादित पगारावर संसार चालवणारे कर्मचारी यांच्यासाठी प्रत्येक रुपयाचे महत्त्व असते. महिन्याचे बजेट आखताना एखाद्या वस्तूचा खर्च वाढला, तर दुसऱ्या गरजेवर काटकसर करावी लागते. भाजीपाला महाग झाला तर खरेदीचे प्रमाण कमी होते, औषधांचा खर्च वाढला तर इतर खर्च पुढे ढकलले जातात आणि मुलांच्या शैक्षणिक गरजांसाठी घरातील इतर आवश्यक बाबींवर मर्यादा आणावी लागते. ही केवळ आर्थिक तडजोड नसून कुटुंबाच्या जीवनमानावर होणारा परिणाम आहे. महागाईचा सर्वाधिक जाणवणारा परिणाम स्वयंपाकघरात दिसतो. दूध, खाद्यतेल, डाळी, धान्य, भाजीपाला आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींमध्ये होणारे चढ-उतार थेट घरखर्चावर परिणाम करतात. बाजारात खरेदीसाठी गेलेल्या नागरिकाला पूर्वीच्या रकमेत आता कमी वस्तू मिळत असल्याचा अनुभव येतो. उत्पन्न तेच आणि खर्च अधिक, अशी परिस्थिती निर्माण झाली की बचत करणे कठीण होते. अचानक उद्भवणारा आजार, घरातील दुरुस्ती, मुलांची फी किंवा एखादा कौटुंबिक समारंभ यासाठी स्वतंत्र पैसे बाजूला ठेवणेही अनेकांना शक्य होत नाही. परिणामी, आर्थिक सुरक्षिततेची भावना कमी होते आणि कर्जावरील अवलंबित्व वाढण्याची शक्यता निर्माण होते. महागाईचा प्रश्न केवळ बाजारातील किमतींपुरता मर्यादित नाही. इंधनाच्या किमती, वाहतूक खर्च, उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल, साठवणूक आणि वितरण व्यवस्था या अनेक घटकांचा वस्तूंच्या अंतिम किमतीवर परिणाम होतो. एखाद्या वस्तूच्या उत्पादन खर्चात वाढ झाली की त्याचा भार अनेकदा ग्राहकांवर टाकला जातो. मात्र, दरवाढीमागील कारणे काय आहेत, पुरवठा साखळीत कुठे अडथळे आहेत आणि अनावश्यक नफेखोरी किंवा साठेबाजी होत आहे का, याची तपासणी करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. बाजारातील प्रत्येक दरवाढीला एकच कारण जबाबदार धरता येत नाही. म्हणूनच महागाईवर नियंत्रण मिळवण्यासाठी परिस्थितीचा अभ्यास करून योग्य त्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. या प्रश्नात सरकार आणि प्रशासनाची भूमिका महत्त्वाची ठरते. जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर लक्ष ठेवणे, साठेबाजी व काळाबाजार रोखणे, सार्वजनिक वितरण व्यवस्थेची कार्यक्षमता वाढवणे आणि गरजू कुटुंबांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचवणे यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न झाले पाहिजेत. केवळ दरवाढ झाल्यानंतर तपासणी मोहीम राबवून प्रश्न सुटत नाही. बाजारातील परिस्थितीचा नियमित आढावा, पुरवठ्यातील अडथळे दूर करणे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर रोजगाराच्या संधी वाढवणे, कामगारांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे आणि लघुउद्योगांना बळ देणे या दीर्घकालीन उपायांकडेही लक्ष दिले पाहिजे. महागाईचा परिणाम ग्रामीण भागातही तितकाच गंभीर आहे.


**शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये रोजगाराची संधी!**
**भरती सुरू आहे**
कृषी क्षेत्रात काम करण्याची संवर्णसंधी!
**पदाचे नाव:-फिल्ड कॉर्डिनेटर - २**
**कामाचे स्वरुप:-**
शेतकऱ्यांबरोबर समन्वय साधणे,शेतकऱ्यांच्या शेतीविषयक मार्गदर्शन व समन्वय,शेतकरी गट/ सभासदांशी नियमित संपर्क ठेवणे, कंपनीच्या कृषीविषयक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करणे
**शैक्षणिक पात्रता**
पद्वीधर/कृषी पदविका/तत्सम शैक्षणिक पात्रता शेती विषयक कामाचा अनुभव असणे गरजेचे
वयोमर्यादा, २५ ते ३५ वर्षे कार्यस्थळ,संगमनेर तालुका
ईच्छुक उमद्वारांनी बायोडाटा पुढील नंबरवर दि. १८/११/२०२६ व्हॉटसअॅप किंवा इमेलवर पाठवावा. संपर्क:9850119046
Email:ens.krishivikasfpc@gmail.com
कृषी क्षेत्रात काम करण्याची आवड आणि शेतकऱ्यांसोबत काम करण्याची क्षमता असलेल्या उमेदवारांनी आजच अर्ज करावा!


# श्री श्री रविशंकर विद्यामंदिरात श्री सूक्त पठण व कुंकूमार्चन सोहळा उत्साहात




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सुमेरू एज्युकेशन सोसायटी संचलित श्री श्री रविशंकर विद्यामंदिर, संगमनेर येथे नवरात्रीनिमित्त श्री सूक्त पठण व कुंकूमार्चन सोहळा उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत सुस्पष्ट आणि शास्त्रोक्त उच्चारात 'श्री सूक्त' पठण केले, तर पालकांनी मोठ्या भक्तीभावाने 'कुंकूमार्चन' सोहळ्यात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या मुखातून उमटणाऱ्या वेद मंत्रांच्या घोषाने संपूर्ण शालेय प्रांगणात भक्तिमय, प्रसन्न आणि चैतन्यमयी आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते.

या सोहळ्यात ज्युनियर व सीनियर केजीच्या चिमुरड्या विद्यार्थिनींनी शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडा, स्कंदमाता, कात्यायनी, कालरात्री, महागौरी आणि सिद्धिदात्री या नवदुर्गेच्या नऊ पावन रूपांची सुरेख वेशभूषा साकारली होती. या लहानग्यांच्या मनमोहक रूपातून साक्षात आद्यशक्ती आणि दैवी चैतन्य अवतरल्याचा अनुभव सर्वांना मिळाला. कार्यक्रमाचे अत्यंत सुरेख व नेटके सूत्रसंचालन इयत्ता तिसरीची विद्यार्थिनी निहिरा प्रसाद रसाळ व तनिष्का विशाल नेहे यांनी केले, तर उपस्थितांचे मन:पूर्वक आभार सत्यजित प्रवीण गुंजाळ या विद्यार्थ्याने मानले. नवरात्रोत्सव हा केवळ एक सण नसून तो आद्यशक्तीच्या उपासनेचा आणि स्त्रीशक्तीच्या सन्मानाचा पावन उत्सव आहे.

सर्वमंगलमांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके । शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणि नमोऽस्तु ते ।।

या भावनेतून स्त्रीमधील धैर्य, शक्ती, वात्सल्य आणि कर्तृत्व या गुणांची जाणीव करून देणारे हे पर्व शाळेत विविध उपक्रमांनी साजरे केले जात आहे. आजच्या काळात बाह्य आकर्षणांचे प्रमाण वाढले असले, तरी मुलींनी स्वत:मधील खरी आंतरिक ताकद व सुप्त गुण ओळखावेत आणि त्याच आत्मविश्वासाने जीवनात पुढे जावे, अशी मोलाची शिकवण या निमित्ताने देण्यात आली. या ध्येयाला अनुसरून श्री श्री रविशंकर विद्यामंदिर ही संस्था केवळ अभ्यासापुरती मर्यादित न राहता विद्यार्थ्यांवर उत्तम संस्कार आणि भारतीय संस्कृतीचे जतन करण्यावर सदैव भर देते. नवरात्रीच्या नऊ दिवसांत दररोज देवीच्या प्रत्येक रूपाचे (नवदुर्गा) महत्त्व, तिची वैशिष्ट्ये आणि त्यामागील सांस्कृतिक व नैतिक मूल्ये विद्यार्थ्यांना परिपाठात समजावून सांगितली जातात.

इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांकडून हे श्री सूक्त पठण उत्तमरीत्या सादरीकृत होण्यासाठी शाळेच्या संगीत शिक्षिका वैशाली देशपांडे यांनी विशेष परिश्रम घेऊन विद्यार्थ्यांची योग्य तयारी करून घेतली होती. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळेच विद्यार्थ्यांनी अत्यंत लयबद्ध आणि स्पष्ट उच्चारात सादरीकरण केले. तसेच या संपूर्ण सोहळ्याचे अत्यंत नेटके आयोजन शिक्षिका संगीता मोरे यांनी केले होते. आजच्या आधुनिक युगात मुलांना असे धार्मिक व सांस्कृतिक संस्कार देणे ही खरोखरच वाखाणण्याजोगी बाब आहे, अशा शब्दांत पालकांनी शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शाळेच्या संस्थापिका स्वाती शहा, सेक्रेटरी समीर शाह, प्राचार्य आरती सप्रा, उपप्राचार्य ज्योतिरमया चव्हाण, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे आणि सर्व संबंधित शिक्षिकांचे विशेष अभिनंदन केले. शालेय जीवनात संस्कृती, अध्यात्म आणि स्त्रीशक्तीच्या सन्मानाची रुजवणूक करणारे असे उपक्रम विद्यार्थ्यांच्या एकाग्रता वाढीसाठी व व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत मार्गदर्शक ठरतात.

## पान १ वरून पेपरफुटीचा बाजार! आयोगापासून ...

**२०२१ : आरोग्य विभाग भरती आणि टीईटी घोटाळा**

२८ ऑक्टोबर २०२१ रोजी झालेल्या आरोग्य विभागाच्या गट-ड भरती परीक्षेतील प्रश्नपत्रिका फुटल्याच्या आरोपांची चौकशी झाली. तपासादरम्यान परीक्षेतील १०० पैकी ९२ प्रश्न समाजमाध्यमांवर फिरल्याचा आरोप पुढे आला. त्याच वर्षी टीईटी आणि म्हाडा भरतीतील कथित गैरप्रकारांचाही तपास सुरू झाला. या प्रकरणांत दलाल, मध्यस्थ आणि काही खासगी संस्थांशी संबंधित व्यक्तींवर कारवाई झाल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले.

**फेब्रुवारी २०२६ : बारावीच्या पेपरवर संशय**

नागपूरमध्ये फेब्रुवारी २०२६ मध्ये बारावीच्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणिताच्या प्रश्नपत्रिकांशी मिळतेजुळते प्रश्न व्हॉट्सपवर प्रसारित झाल्याचा प्रकार समोर आला. या प्रकरणात शिकवणी वर्गाशी संबंधित व्यक्तींची चौकशी झाल्याचे वृत्त आले. मात्र, प्रश्नांची समानता म्हणजे प्रश्नपत्रिका प्रत्यक्ष फुटल्याचा अंतिम पुरावा ठरत नाही; तपासातील निष्कर्ष महत्त्वाचे आहेत.

**१७ मार्च २०२६ : सांगोल्यात प्रश्नपत्रिका चोरी**

सोलापूर जिल्ह्यातील सांगोला येथे दहावीच्या भूगोल विषयाच्या सुमारे ५० प्रश्नपत्रिका परीक्षा केंद्राच्या सुरक्षित कक्षातून चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली. दुसऱ्या दिवशी परीक्षा होणार असताना घडलेल्या या प्रकाराने परीक्षा सुरक्षेतील त्रुटी अधोरेखित केल्या. मात्र, चोरी झालेल्या प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचल्याचा निष्कर्ष स्वतंत्र पुराव्याशिवाय काढता येणार नाही.

**२२ मार्च २०२६ : एमपीएससी औषध निरीक्षक परीक्षा**

एमपीएससीच्या औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेतील प्रश्नपत्रिका आधीच बाहेर आल्याचा आरोप झाला. सुरुवातीला आयोगाने पेपरफुटीचा पुरावा नसल्याची भूमिका घेतली; पुढे तपासाला वेगळे वळण मिळाले. २५ ऑगस्ट २०२६ रोजी भरती प्रक्रिया रद्द करण्यात आली आणि २६ ऑगस्टला आयोगातील अधिकारी व खासगी संस्थेशी संबंधित व्यक्तींसह सहा जणांना अटक झाल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले.

**ऑक्टोबर २०२६ : कोचिंग क्लासच्या संपर्कांची चौकशी**

१३ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, नंदुरबारमधील एका शिक्षकाला अटक करण्यात आली. उमेदवाराच्या वडिलांची कोचिंग संस्थेच्या संचालकाशी ओळख करून दिल्याचा आरोप पोलिसांनी केला. या प्रकरणातील आरोप न्यायालयीन प्रक्रियेत सिद्ध होणे आवश्यक आहे.

**कोचिंग क्लासेसच्या भूमिकेचीही निष्पक्ष चौकशी हवी!**

प्रत्येक कोचिंग क्लासला संशयाच्या भोवऱ्यात ओढणे चुकीचे आहे; मात्र प्रश्नपत्रिका मिळवून देण्याची आश्वासने, संशयास्पद आर्थिक व्यवहार, दलालांशी संपर्क आणि उमेदवारांपर्यंत प्रश्नपत्रिका पोहोचवणारी संभाव्य साखळी यांची कसून चौकशी झाली पाहिजे. भरती प्रक्रियेतील अधिकारी, मध्यस्थ, खासगी संस्था आणि संबंधित उमेदवार यांच्यातील संपर्कांची पुराव्यांच्या आधारे तपासणी होणे गरजेचे आहे.

एमपीएससी परीक्षांतील कथित गैरप्रकारांच्या पार्श्वभूमीवर उच्चस्तरीय चौकशी समिती नेमल्याचे वृत्त आहे. मात्र, समितीची घोषणा पुरेशी नाही. चौकशी वेळेत पूर्ण होणे, दोषींवर कारवाई होणे आणि निष्पाप विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी पारदर्शक व्यवस्था उभी राहणे आवश्यक आहे.

प्रश्नपत्रिका विकत घेणाऱ्यांना नोकरी आणि प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्यांना प्रतीक्षा ही व्यवस्था बदलणार कधी? पेपरफुटीची साखळी कुठे सुरू होते, कोणाच्या संरक्षणाखाली चालते आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्यांपर्यंत तपास पोहोचतो का, याची उत्तरे आता महाराष्ट्राला हवी आहेत.

## पान १ वरून अघोरी पूजेच्या...

'मुले घरी आली असतील' म्हणत केली सुटका - या अनपेक्षित प्रकारातून बाहेर पडण्यासाठी महिलेने प्रसंगावधान राखले. शाळेतून मुले घरी आली असतील, असे कारण सांगत तिने तेथून कशीबशी सुटका करून घेतली. मात्र, तिला घरी सोडण्यासाठी सोबत आलेल्या ओळखीच्या महिलेनेही तिच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. 'नकार देऊ नकोस, त्यांना पाहिजे तशी तू आहेस,' असे सांगून तिचे मन वळवण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. घरी परतल्यानंतर महिलेने घडलेला संपूर्ण प्रकार पतीला सांगितला. त्यानंतर तिने राजूर पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली. महिलेने दाखवलेल्या धाडसामुळे कथित भोंदूगिरीचा हा प्रकार समोर आला. या प्रकरणी राजूर पोलिसांनी भोंदूसह सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केल्याचे समजते. यातील तिघांना अटक करण्यात आल्याची माहिती आहे. पैशांचा पाऊस पाडण्याचे आमिष दाखवणारा कथित भोंदू नाशिक येथील असल्याचे समजते. तो पसार झाला असून, पोलिस त्याचा शोध घेत आहेत. अघोरी पूजा, अदृश्य शक्ती आणि पैशांचा पाऊस अशा भुलथापांचा वापर करून महिलेला जाळ्यात ओढण्याचा कथित प्रकार उघड झाल्याने परिसरात चर्चेला उधाण आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास राजूर पोलिस करत आहेत.

### जाहीर समन्स

**मा. न्यायाधिश, सहकार न्यायालय नं. २ कोपरगांव जि. अहमदनगर यांचे न्यायालयात**
**ल.मु.नं.१३९/२०२६**

महिला ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या, अकोले, ता. अकोले जि. अहिल्यानगर — **वादी**

**विरुध्द**

१) **श्री. बाळासाहेब सयाजी फोडसे रा.द्वारे श्री. सयाजी लक्ष्मण फोडसे, रा. घोडसरवाडी, ता. समशेरपूर, फाट्यावर ता. अकोले. जि. अहिल्यानगर** — **प्रतिवादी**
२) श्री. सुभाष नामदेव मोखरे, ता. अकोले जि. अहिल्यानगर
३) श्री. गणेश चंद्रकांत गारले रा. मु. घोडसरवाडी, पो. समशेरपूर ता. अकोले जि. अहिल्यानगर

**दावा– रक्कम वसुलीसाठी**

वादी यांनी तुमच्या विरुध्द वसुली कामी वाद दाखल केला आहे, म्हणून सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी तुम्हाला याव्दारे **दिनांक ३०/१०/२०२६ रोजी मध्यान्ही ११ वाजता सहकारी न्यायालय नं.२ कोपरगांव जि. अहमदनगर** या न्यायालयात जातीने हजर राहण्यासाठी बोलवण्यात येत आहे. व आपल्या बचावाच्या पुष्ट्यर्थ तुम्ही ज्याचा आधार घेवू इच्छिता असे सर्व दस्त ऐवज त्या दिवशी रुजू करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहील्यास तुमच्या गैरहजेरीत वादाची सुनावणी एकतर्फे होऊन निर्णय देण्यात येईल याची दखल घ्यावी.

तसेच तुम्हाला अशीही दखल देण्यात येते आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पूर्वी तुम्ही बजावणीसाठी तुमचा पत्ता दाखल न केल्यास तुमचा बचाव रद्द होण्यास पात्र ठरेल. आज **दिनांक ०९/१०/२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**मा. न्यायाधीश यांचे हुकूमान्वये.**

**कोर्टाचा पत्ता**
**न्यायाधीश सहकार न्यायालय नं.२ कोपरगांव**
**गोदावरी प्रवरा क. स. ख. वि. संघ इमारत कोट रोड**
**कोपरगांव ता. कोपरगाव जि. अहमदनगर.**

**शिरस्तेदार**
**सहकार न्यायालय नं. २ कोपरगांव**
**जि. अहमदनगर**

### जाहीर समन्स

**मा. न्यायाधिश, सहकार न्यायालय नं. २ कोपरगांव जि. अहमदनगर यांचे न्यायालयात**
**ल.मु.नं.१३७/२०२६**

महिला ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या, अकोले, ता. अकोले जि. अहिल्यानगर — **वादी**

**विरुध्द**

१) सौ. आशा गवराम आरोटे रा.द्वारा. शिवाजी रामभाऊ शिंदे, एरीगेशन कॉलनी देवठाण, ता. अकोले जि. अहिल्या नगर — **प्रतिवादी**
२) **श्री. गवराम सहादु आरोटे रा.मु.पो. धुमाळवाडी, ता. अकोले जि. अहिल्यानगर**
३) श्री. प्रकाश दत्तु यादव रा.मु.पो. धुमाळवाडी, ता. अकोले जि. अहिल्यानगर

**दावा– रक्कम वसुलीसाठी**

वादी यांनी तुमच्या विरुध्द वसुली कामी वाद दाखल केला आहे, म्हणून सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी तुम्हाला याव्दारे **दिनांक ३०/१०/२०२६ रोजी मध्यान्ही ११ वाजता सहकारी न्यायालय नं.२ कोपरगांव जि. अहमदनगर** या न्यायालयात जातीने हजर राहण्यासाठी बोलवण्यात येत आहे. व आपल्या बचावाच्या पुष्ट्यर्थ तुम्ही ज्याचा आधार घेवू इच्छिता असे सर्व दस्त ऐवज त्या दिवशी रुजू करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहील्यास तुमच्या गैरहजेरीत वादाची सुनावणी एकतर्फे होऊन निर्णय देण्यात येईल याची दखल घ्यावी.

तसेच तुम्हाला अशीही दखल देण्यात येते आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पूर्वी तुम्ही बजावणीसाठी तुमचा पत्ता दाखल न केल्यास तुमचा बचाव रद्द होण्यास पात्र ठरेल. आज **दिनांक ०९/१०/२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**मा. न्यायाधीश यांचे हुकूमान्वये.**

**कोर्टाचा पत्ता**
**न्यायाधीश सहकार न्यायालय नं.२ कोपरगांव**
**गोदावरी प्रवरा क. स. ख. वि. संघ इमारत कोट रोड**
**कोपरगांव ता. कोपरगाव जि. अहमदनगर.**

**शिरस्तेदार**
**सहकार न्यायालय नं. २ कोपरगांव**
**जि. अहमदनगर**

### जाहीर समन्स

**मा. न्यायाधिश, सहकार न्यायालय नं. २ कोपरगांव जि. अहमदनगर यांचे न्यायालयात**
**ल.मु.नं.१३५/२०२६**

महिला ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या, अकोले, ता. अकोले जि. अहिल्यानगर — **वादी**

**विरुध्द**

१) सौ. रूपाली प्रदीप खरात — **प्रतिवादी**
२) **श्री. प्रदीप दगडु खरात, दोघे रा. द्वारे बाबासाहेब अर्जुन साळवे, मु. पो. बोलकी, ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर**
३) श्री. अनिल सदाशिव पवार, रा. सुगाव खुर्द, ता. अकोले जि. अहिल्यानगर

**दावा– रक्कम वसुलीसाठी**

वादी यांनी तुमच्या विरुध्द वसुली कामी वाद दाखल केला आहे, म्हणून सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी तुम्हाला याव्दारे **दिनांक ३०/१०/२०२६ रोजी मध्यान्ही ११ वाजता सहकारी न्यायालय नं.२ कोपरगांव जि. अहमदनगर** या न्यायालयात जातीने हजर राहण्यासाठी बोलवण्यात येत आहे. व आपल्या बचावाच्या पुष्ट्यर्थ तुम्ही ज्याचा आधार घेवू इच्छिता असे सर्व दस्त ऐवज त्या दिवशी रुजू करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहील्यास तुमच्या गैरहजेरीत वादाची सुनावणी एकतर्फे होऊन निर्णय देण्यात येईल याची दखल घ्यावी.

तसेच तुम्हाला अशीही दखल देण्यात येते आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पूर्वी तुम्ही बजावणीसाठी तुमचा पत्ता दाखल न केल्यास तुमचा बचाव रद्द होण्यास पात्र ठरेल. आज **दिनांक ०९/१०/२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**मा. न्यायाधीश यांचे हुकूमान्वये.**

**कोर्टाचा पत्ता**
**न्यायाधीश सहकार न्यायालय नं.२ कोपरगांव**
**गोदावरी प्रवरा क. स. ख. वि. संघ इमारत कोट रोड**
**कोपरगांव ता. कोपरगाव जि. अहमदनगर.**

**शिरस्तेदार**
**सहकार न्यायालय नं. २ कोपरगांव**
**जि. अहमदनगर**


**पाहिजेत**
रिसेप्शनिस्ट- १
(स्त्री / पुरूष)
शिक्षणास प्राधान्य
कॉम्प्युटर ज्ञान,
- संपर्क -
8378956909
8459199913
बायोडाटा पाठवा

**पाहिजेत**
ध्येय फायनान्स संगमनेर
Branch manager BM-1
Branch devlopment Menegar BDM- 1
Sales devlopment MenegarSDM - 1
Telicaller - 2 M/F
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
9370773504
7768079272

**पाहिजेत**
ड्रायव्हर कम हेल्पर पाहिजे
आत्मशांती टी सेंटर
( सपट चहा)
नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**पाहिजेत**
सेल्समन - ४ जागा
अकाऊंटंट - १ जागा
मॅनेजर - १ जागा
(अनुभवास प्राधान्य )
आकर्षक पगार दिले जाईल
मैड सराफ अॅण्ड सन्स
नेहरूचौक, संगमनेर
9850530266

**पाहिजेत**
डिप्लोमा सिव्हिल इंजिनिअर - 2 जागा
स्वतःची टू व्हीलर लायसन्स आवश्यक
B & K Construction
7758009532
7028456005

**Urgently Required**
Office Manager
Sangamner (1 Post)
Valuation Report Typist,
Property Visit.
Office Management.
Contact-
9421911671

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

**जागा भरणे आहे**
ऑफिस बॉय
ऑफिस क्लार्क
महिला किंवा पुरूष
इलेक्ट्रॉनिक मशिनरी चालविणेचा अनुभव असलेला कारागीर
वॉचमेन
अनुभवास प्राधान्य
- संपर्क -
9822334431








# पानोडी घरफोडीतील टोळीचा एलसीबीकडून छडा

## चार आरोपी गजाआड - तीन फरार साथीदारांचा शोध सुरू

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील पानोडी येथे बंद घराचे कुलूप तोडून दागिने आणि रोख रक्कम लंपास करणाऱ्या घरफोड्यांच्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) अवघ्या ७२ तासांत छडा लावला आहे. या प्रकरणात चार आरोपींना श्रीगोंदा तालुक्यातील कोळगाव शिवारातून शिताफीने जेरबंद करण्यात आले असून, त्यांना १६ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

पानोडी येथील रहिवासी नवनाथ पाबळ यांच्या बंद घराचा कडी-कोयंडा तोडून अज्ञात चोरट्यांनी ८ ऑक्टोबरच्या रात्री घरात प्रवेश केला होता. चोरट्यांनी कपाटातील अडीच लाखांची रोख रक्कम आणि दोन लाखांचे सोन्याचे दागिने असा एकूण साडेचार लाखांचा ऐवज चोरून नेला होता. या प्रकरणी पाबळ यांच्या फिर्यादीवरून आश्वी पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य ओळखून जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला समांतर तपासाचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे, पोलीस अंमलदार बाळासाहेब नागरगोजे, अरविंद भिंगारदिवे, योगेश भिंगारदिवे, गणेश धोत्रे, अशोक लिपणे, प्रताप देवकाते, अमोल कोतकर, भाऊसाहेब काळे आणि सतीष भवर यांच्या पथकाने गोपनीय खबऱ्यांचे जाळे व सायबर सेलच्या तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास वेगवान केला.

हा गुन्हा सायरब जैनू काळे आणि त्याच्या साथीदारांनी केल्याचे निष्पन्न झाले. हे संशयित आरोपी श्रीगोंदा तालुक्यातील कोळगाव शिवारात दबा धरून असल्याची खात्रीशीर माहिती मिळताच, पोलिसांनी रविवारी (११ ऑक्टोबर) परिसरात धाड टाकून चौघांना ताब्यात घेतले. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींमध्ये सायरब जैनू काळे (रा. जि. छत्रपती संभाजीनगर), कलर सुरेश काळे, सोन्या सुरेश काळे आणि संदीप सुरेश काळे (सर्व रा. जि. अहिल्यानगर) यांचा समावेश आहे. पोलिसांनी कसून चौकशी केली असता त्यांनी पानोडी येथील गुन्ह्याची कबुली दिली. तसेच हा गुन्हा अमरेश निजाम काळे, बाबू टबुक्या चव्हाण आणि घाऱ्या टबुक्या चव्हाण (सर्व रा. जि. छत्रपती संभाजीनगर) या तीन फरार साथीदारांच्या मदतीने केल्याची माहिती उघड केली.

ताब्यातील चारही आरोपींना पुढील तपासासाठी आश्वी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. संगमनेर न्यायालयाने त्यांना १६ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असल्याची माहिती आश्वीचे सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांनी दिली.

# चॉकलेटचे अमिष दाखवून चिमुरडीच्या अपहरणाचा प्रयत्न

युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव - संगमनेर तालुक्यातील कोठे बुद्रुक येथे तीन वर्षांच्या चिमुरडीला चॉकलेटचे आमिष दाखवून जवळ बोलावण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शुक्रवारी (दि.९) सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली असून, लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

जगदीश संपत हांडे यांचे गावात किराणा दुकान आहे ते दुकानात होते. त्यांची पत्नी घरात शिवणकाम करत होती, तर तीन वर्षांची मुलगी घराबाहेर खेळत होती. याच दरम्यान एक कार तेथे आली. कारमधून खाली उतरलेल्या एका व्यक्तीने हातातील चॉकलेट दाखवून मुलीला स्वतःजवळ बोलावण्याचा प्रयत्न केला. मात्र, मुलगी कारजवळ गेली नाही. त्यानंतर संबंधित व्यक्तीने चॉकलेट खाली ठेवून बाजूला जाण्याचा प्रयत्न केला, तरीही मुलगी त्याच्याकडे जाण्यास तयार झाली नाही.

दरम्यान, कारमध्ये बसलेल्या एका महिलेने हिंदी भाषेत आवाज देत मुलीला चॉकलेट घेण्यासाठी बोलावले. अनोळखी व्यक्तीचा हिंदी भाषेतील आवाज ऐकून मुलीच्या आईला संशय आला. तिने तातडीने घराबाहेर धाव घेतली. त्यावेळी तिला एक पुरुष आणि एक महिला दिसली. मुलीच्या आईला पाहताच या दोघांनीही चॉकलेट तिथेच सोडून घटनास्थळावरून पळ काढला. या घटनेची माहिती मिळताच जगदीश यांचे बंधू वैभव हांडे यांनी घारगाव पोलिसांशी संपर्क साधला. या घटनेमागील नेमका उद्देश काय होता, संबंधित व्यक्ती मुलीला कशासाठी बोलावत होत्या, याबाबत परिसरात विविध शंका व्यक्त केल्या जात आहेत. मात्र, या व्यक्तींचा हेतू अद्याप स्पष्ट झालेला नाही.

या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासावे, संबंधित कारचा क्रमांक व अन्य माहिती मिळवावी आणि त्या महिला-पुरुषांचा शोध घेऊन सखोल चौकशी करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. लहान मुलांना चॉकलेट किंवा अन्य वस्तूंचे आमिष दाखवून जवळ बोलावण्याच्या प्रयत्नांबाबत पालकांनी सतर्क राहण्याची गरज या घटनेमुळे पुन्हा अधोरेखित झाली आहे.

# बुधवारी थोरात सहकारी साखर कारखान्याचा गळीत हंगाम शुभारंभ

युवावार्ता (प्रतिनिधी)



संगमनेर -देशातील सहकारासाठी दीपस्तंभ असलेल्या सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२६-२७ या गळीत हंगामाचा शुभारंभ बुधवार दिनांक १४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य मा. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात व कांचनताई थोरात यांच्या शुभहस्ते तर मा. आ. डॉ. सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे व डॉ जयश्रीताई थोरात यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला असल्याची माहिती व्हाईस चेअरमन पांडुरंग पाटील घुले यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना पांडुरंग पाटील घुले म्हणाले की या वर्षीचा गळीत हंगाम हा कारखान्याचा ६० वा गणित हंगाम आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याने कायम ऊस उत्पादक शेतकरी कामगार यांचे हित जोपासले आहे. कार्यक्षेत्राबाहेरील शेतकऱ्यांचा मोठा विश्वास संपादन केला आहे. सातत्याने चांगला भाव दिला आहे. सन २०२६ २७ या गळीत हंगामाचा शुभारंभ बुधवार दिनांक १४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९ वा. होणार आहे यावेळी काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, कांचनताई थोरात, दुर्गाताई तांबे, आ. सत्यजित तांबे, ॲड. माधवराव कानवडे, बाबा ओहोळ, डॉ. जयश्रीताई थोरात, रणजितसिंह देशमुख, शंकरराव खेमनर, नगराध्यक्षा डॉ. मैथिलीताई तांबे, संपतराव डोंगरे, सुधाकर जोशी, हौशीराम सोनवणे, रामहरी कातोरे, अजय फटांगरे, सोमेश्वर दिवटे, प्रा. बाबा खरात, गणपतराव सांगळे, रामदास वाघ, इंद्रजीत थोरात, शरद थोरात, सुभाष सांगळे, निखिल पापडेजा, गौरव डोंगरे यांच्यासह तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या गळीत हंगामासाठी सर्व सभासद, ऊस उत्पादक शेतकरी पदाधिकारी कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सर्व संचालक मंडळ व कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी केले आहे.


## श्री क्षेत्र रामेश्वर देवस्थान ट्रस्ट धांदरफळ बु.,

ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर.

ईमेल: id-rameshwardevstana@gmail.com/Establishment;30/09/2005

Trust Act.Regn; A-1243 AHILYANAGAR

**खालील कामासंदर्भात देवस्थानकडून निविदा मागविण्यात येत आहे**

**जाहीर निविदेमधील प्रमुख काम**

**रामेश्वर देवस्थान ट्रस्ट धांदरफळ बु/त. संगमनेर जि. अहिल्यानगर या ठिकाणी दगडी नंदी सभामंडप तयार करणे.**

१. दगडाचा प्रकार / काळा दगडी पाषाण
२. दगड वाहतूक व्यवस्था/कटिंग / फिटिंग
३. दगडी खांब तयार करून बसवणे.
४. ९ ते १० इंच मापाच्या खांडक्यामध्ये भिंतीचे बांधकाम करणे.
५. योग्य ठिकाणी गलथा मोल्डिंग वापर
६. खिडक्यांना महिरप करणे.
७. पायऱ्या व इतर दगडी काम करणे.
८. दगडी नक्षीकाम/कोरीव काम करणे.
९ नंदी मूर्ती दगडी चौथरा इतर आवश्यक दगडी काम
१०. सिमेंट / वाळू व बांधकामासाठी लागणारे साहित्य व मटेरिअल

**समाविष्ट बाबी**

आवश्यक दगड निवड, कटिंग, व आकार देणे
दगडी खांब, तुळया, व इतर संरचनात्मक भाग तयार करणे
दगडी भागांची योग्य मापानुसार फिटिंग व बांधकाम करणे.
तयार केलेले दगडी काम कामाच्या ठिकाणी आणून बसविणे.
कामाची मजबुती, समतोल पारंपारिक स्थापत्यशैली नुसार बांधकाम करणे.
ठरवून दिलेल्या वेळेत काम पूर्ण करणे

**अटी व शर्ती लागू**

१. इच्छुकांनी आपली निविदा ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ५ दिवसांच्या आत बंद पाकिटात पोस्टाने किंवा प्रत्यक्ष कार्यालयात आणून देणे आवश्यक.
२. निविदा मंजूर अथवा नामंजूर तथा निगोशिएशन करण्याचा अधिकार देवस्थानकडे राहील.
३. निविदा मंजूर होणाऱ्या निविदाधारकास STAMPवर करारनामा करून देणे बंधनकारक राहील.

**सुचना - दगडी इंटीरीयर कामाचे डिझाईन देवस्थान कार्यालयात पहावयास मिळेल**

निविदेबाबतचे सविस्तर नियम आणि अटी देवस्थानच्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

पत्र व्यवहाराचा पत्ता

**अध्यक्ष** **सचिव**

**रामेश्वर देवस्थान ट्रस्ट धांदरफळ बु ता. संगमनेर. जि. अहिल्यानगर**


# चार एकर ऊस जळून खाक

## महावितरणच्या दुर्लक्षामुळे नुकसान शेतकऱ्यांचा आरोप

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील कनोली शिवारात सोमवारी (दि.१२) दुपारी वीजवाहिनीच्या तारांमध्ये घर्षण होऊन ठिणग्या पडल्याने लागलेल्या आगीत सुमारे चार एकर ऊस जळून खाक झाला. या दुर्घटनेत तीन शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज असून, पाच वर्षांपासून जीर्ण तारा बदलण्याची मागणी करूनही कार्यवाही झाली नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

कनोली शिवारातील गट क्रमांक ३९० मध्ये सचिन शिवाजी वर्पे यांनी २६५ जातीच्या उसाची लागवड केली होती, सोमवारी दुपारी सव्वाबारा वाजण्याच्या सुमारास त्यांच्या शेताजवळून जाणाऱ्या जाणाऱ्या महावितरणच्या मुख्य वीजवाहिनीच्या तारांमध्ये घर्षण झाल्याने उसाने पेट घेतल्याची माहिती आहे. काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण केले आणि शेतातील उभे पीक आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. या आगीत सचिन वर्पे यांचा सुमारे दोन एकर ऊस जळाला, तर शेजारील शेतकरी मच्छिंद्र भिवाजी वर्पे आणि दत्तू भिवाजी वर्पे या दोन भावांचा प्रत्येकी ३० गुंठे ऊस जळून खाक झाला. स्थानिक

नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतल्याने आग इतर पिकांपर्यंत पसरण्यापासून रोखण्यास मदत झाली. मात्र, या आगीत तिन्ही शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. पिंपरणे उपकेंद्र ते कनोली गावादरम्यान असलेल्या मुख्य वीजवाहिनीच्या तारा जीर्ण व कमकुवत झाल्या असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. या तारा बदलून नवीन वीजवाहिनी टाकावी, यासाठी गेल्या पाच वर्षांपासून महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे वारंवार मागणी करण्यात आली होती. यासंदर्भात बैठकही झाली होती. त्यावेळी तारा बदलण्याचे आश्वासन देण्यात आल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला. मात्र, आजपर्यंत या तारा बदलून देण्यात आल्या नसल्याचा आरोप नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केला आहे.

## दिनविशेष

१९८२: रोनाल्ड रेगन — अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष यांनी अमली पदार्थांविरुद्ध युद्ध
१९८१: होस्नी मुबारक — यांची इजिप्तचे ४थे अध्यक्ष म्हणून निवड.
१९६८: जिम हाइन्स — १००-मीटर स्प्रिंट पाळण्याच्या शर्यतीमध्ये ९.९५ सेकंद वेळेसह तथाकथित 'दहा-सेकंदचा अडथळा' पार करणारे पहिले धावपटू बनले.
१९६६: मॉन्ट्रियल मेट्रो — मॉन्ट्रियल शहरातील भूमिगत जलद संक्रमण प्रणाली सुरु झाली.
१९५६: बाबासाहेब आंबेडकर — यांनी आपल्या सुमारे ३,८०,००० अनुयायांसह दीक्षाभूमी, नागपूर येथे बौद्ध धर्मात प्रवेश केला.
१९५२: कोरियन युद्ध — ट्रायंगल हिलची लढाई: १९५२ची सर्वात मोठी आणि रक्तरंजित लढाई आहे.
१९४७: चक येगर — हे ध्वनीपेक्षा जास्त वेगाने पहिले यशस्वी उड्डाण करणारे वैमानिक बनले.
१९३३: जर्मनी — लीग ऑफ नेशन्स आणि जागतिक नि:शस्त्रीकरण परिषदेतून माघार घेतली .

## जन्म

१९८१: गौतम गंभीर — भारतीय क्रिकेटपटू व राजकारणी — पद्मश्री
१९५८: उस्ताद शाहिद परवेझ — भारतीय इटावा घराण्याचे सतार वादक — पद्मश्री, संगीत नाटक अकादमी पुरस्कार
१९४०: क्लिफ रिचर्ड — भारतीय गायक गीतकार आणि अभिनेते
१९३९: राल्फ लॉरेन — अमेरिकन फॅशन डिझायनर, राल्फ लॉरेन कॉर्पोरेशनचे संस्थापक
१९३६: सुभाष भेंडे — भारतीय लेखक (निधन: २० डिसेंबर २०१० )
१९३१: निखिल बॅनर्जी — भारतीय मैहर घराण्याचे सतारवादक (निधन: २७ जानेवारी १९८६ )
१९२७: रॉजर मूर — इंग्लिश अभिनेते
१९२४: बीरेन्द्रकुमार भट्टाचार्य — भारतीय आसामी लेखक आणि कादंबरीकार, आधुनिक आसामी साहित्याचे प्रमुख लेखक म्हणून प्रसिद्ध — ज्ञानपीठ पुरस्कार, साहित्य अकादमी

## मृत्यू

२०२५: बाबू एम. पळिस्सरी — भारतीय राजकारणी, केरळचे आमदार
२०२५: रवि नाईक — भारतीय राजकारणी, गोव्याचे माजी मुख्यमंत्री आणि भारतीय जनता पार्टीचे सदस्य (जन्म: १८ सप्टेंबर १९४६ )
२०२२: एन. यु. प्रभु — भारतीय-अमेरिकन गणितज्ञ (जन्म: २५ एप्रिल १९२४ )
२०२२: केदार सिंग फोनिया — भारतीय राजकारणी, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडचे आमदार (जन्म: ६ ऑक्टोबर १९३० )
२०१५: राधाकृष्ण हरिराम तहिलियानी — भारतीय नौसेनाधिपती (जन्म: १२ मे १९३० )
२०१३: मोहन धारिया — भारतीय राजकारणी, केंद्रीय मंत्री (जन्म: १४ फेब्रुवारी १९२५ )
२०११: रेग अल्कॉक — कॅनेडियन उद्योगपती आणि राजकारणी, ट्रेझरी बोर्डाचे १७वे कॅनेडियन अध्यक्ष (जन्म: १६ एप्रिल १९४८ )
२००४: दत्तोपंत ठेंगडी — भारतीय समाजकारणी, स्वदेशी जागरण मंच, मजदूर संघ व कामगार संघ संस्थापक (जन्म: १० नोव्हेंबर १९२० )
१९९९: ज्युलिअस न्येरेरे — टांझानियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: १३ एप्रिल १९२२ )
१९९७: हेरॉल्ड रॉबिन्स — अमेरिकन कादंबरीकार (जन्म: २१ मे १९१६ )




# दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**१४ ऑक्टोबर**

# १९५६: बाबासाहेब आंबेडकर यांनी ३,८०,००० अनुयायांसह नागपूर येथे बौद्ध धर्मात प्रवेश केला

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथील दीक्षाभूमीवर बौद्ध धर्माचा स्वीकार केला. या ऐतिहासिक सोहळ्यात त्यांच्यासोबत सुमारे ३ लाख ८० हजार अनुयायांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. भारतीय इतिहासातील ही एक महत्त्वपूर्ण सामाजिक आणि धार्मिक घटना मानली जाते.डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार, महान समाजसुधारक, अर्थतज्ज्ञ आणि कायदेतज्ज्ञ होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य सामाजिक विषमता, जातिभेद आणि अस्पृश्यता दूर करण्यासाठी समर्पित केले. समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार, शिक्षणाची संधी आणि सन्मानाने जगण्याचा हक्क मिळावा, यासाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला.लहानपणापासूनच बाबासाहेबांना जातिभेद आणि अस्पृश्यतेचे कटू अनुभव आले होते. शिक्षणाच्या बळावर त्यांनी या अन्यायाविरुद्ध लढा उभारला. महाडचा चवदार तळे सत्याग्रह, मंदिरप्रवेश चळवळ आणि वंचित समाजाच्या हक्कांसाठी केलेली आंदोलने यांमधून त्यांनी सामाजिक परिवर्तनाचा संदेश दिला. समाजात समानता प्रस्थापित करण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नसून लोकांच्या विचारांमध्येही बदल होणे आवश्यक आहे, असे त्यांचे मत होते.१९३५ मध्ये नाशिक जिल्ह्यातील येवला येथे झालेल्या परिषदेत बाबासाहेबांनी हिंदू धर्मात राहणार नसल्याची घोषणा केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक धर्मांचा सखोल अभ्यास केला. गौतम बुद्धांच्या शिकवणीत त्यांना समता, स्वातंत्र्य, बंधुता, करुणा आणि विवेक यांना महत्त्व देणारा मार्ग दिसला. त्यामुळे त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारण्याचा निर्णय घेतला.१४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथील दीक्षाभूमीवर भदंत चंद्रमणी महास्थवीर यांच्या हस्ते बाबासाहेबांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. त्यानंतर त्यांनी उपस्थित अनुयायांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली. या वेळी त्यांनी बावीस प्रतिज्ञा सांगितल्या. या प्रतिज्ञांमधून जातिभेद, अंधश्रद्धा आणि विषमतेचा त्याग करून बुद्धांच्या शिकवणीनुसार जीवन जगण्याचा संदेश देण्यात आला.या धर्मांतरामुळे देशात नवबौद्ध चळवळीला मोठी प्रेरणा मिळाली. दीक्षाभूमी हे ठिकाण सामाजिक परिवर्तन, आत्मसन्मान आणि समतेचे प्रतीक बनले. दरवर्षी १४ ऑक्टोबर रोजी धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा केला जातो. या दिवशी देशाच्या विविध भागांतून लाखो अनुयायी नागपूर येथील दीक्षाभूमीवर येऊन बाबासाहेबांना अभिवादन करतात.बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर काही आठवड्यांतच, ६ डिसेंबर १९५६ रोजी बाबासाहेबांचे निधन झाले. मात्र, त्यांनी दिलेला समतेचा आणि मानवतेचा संदेश आजही समाजाला प्रेरणा देतो. शिक्षण, सामाजिक न्याय, बंधुता आणि समान हक्क यांसाठी त्यांनी केलेले कार्य भारतीय इतिहासात महत्त्वाचे स्थान राखून आहे.दीक्षाभूमीवरील धर्मांतर ही केवळ धार्मिक घटना नव्हती, तर सामाजिक विषमतेविरुद्ध उभारलेली ऐतिहासिक चळवळ होती.

# गौतम गंभीर : भारतीय क्रिकेटपटू आणि राजकारणी

**जन्मदिन विशेष**

गौतम गंभीर यांचा जन्म १४ ऑक्टोबर १९८१ रोजी नवी दिल्ली येथे झाला. ते भारताचे माजी आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू, क्रिकेट प्रशिक्षक आणि राजकारणी आहेत. भारतीय क्रिकेट संघाच्या अनेक महत्त्वपूर्ण विजयांमध्ये त्यांनी मोलाची भूमिका बजावली. आपल्या आक्रमक फलंदाजीसाठी आणि कठीण परिस्थितीत संघाला सावरण्याच्या क्षमतेसाठी ते ओळखले जातात. क्रिकेटमधील कामगिरीबद्दल त्यांना २०१९ मध्ये भारत सरकारचा पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला.गौतम गंभीर यांना लहानपणापासूनच क्रिकेटची आवड होती. त्यांनी कमी वयातच क्रिकेटचे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. मेहनत, सातत्य आणि खेळाप्रती असलेल्या समर्पणामुळे त्यांनी भारतीय क्रिकेटमध्ये स्वतःचे स्थान निर्माण केले. देशांतर्गत क्रिकेटमधील चांगल्या कामगिरीनंतर त्यांना भारतीय संघात खेळण्याची संधी मिळाली.२००३ मध्ये त्यांनी बांगलादेशविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यातून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्यानंतर २००४ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी सामन्यातून त्यांनी कसोटी क्रिकेटमध्ये प्रवेश केला. सुरुवातीच्या काळात चढ-उतारांचा सामना करत त्यांनी आपल्या फलंदाजीमध्ये सुधारणा केली आणि संघातील महत्त्वाचे फलंदाज म्हणून ओळख निर्माण केली.२००७ च्या ट्वेंटी-२० विश्वचषकात गौतम गंभीर यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. पाकिस्तानविरुद्धच्या अंतिम सामन्यात त्यांनी ७५ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. त्यांच्या या खेळीमुळे भारताला स्पर्धेचे विजेतेपद मिळवण्यात मोठी मदत झाली. २००७ मध्ये महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखाली भारताने पहिला ट्वेंटी-२० विश्वचषक जिंकला



होता.२०११ च्या एकदिवसीय विश्वचषकातील अंतिम सामनाही त्यांच्या कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा ठरला. श्रीलंकेविरुद्धच्या अंतिम सामन्यात त्यांनी ९७ धावा केल्या. या खेळीमुळे भारताच्या विजयाचा मार्ग सुकर झाला. भारताने हा सामना जिंकून २८ वर्षांनंतर एकदिवसीय विश्वचषकावर आपले नाव कोरले. या विजयात गंभीर यांच्या योगदानाला विशेष महत्त्व आहे.गौतम गंभीर यांनी कसोटी, एकदिवसीय आणि ट्वेंटी-२० अशा तिन्ही प्रकारच्या क्रिकेटमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण सामने खेळले आणि संघाच्या विजयात योगदान दिले. २०११ मध्ये त्यांना भारत सरकारचा अर्जुन पुरस्कार प्रदान करण्यात आला. २०१९ मध्ये क्रिकेटमधील योगदानाबद्दल त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.२०१८ मध्ये त्यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. निवृत्तीनंतरही ते क्रिकेटशी संबंधित राहिले. त्यांनी समालोचक म्हणून काम केले तसेच विविध क्रिकेट स्पर्धांमध्ये मार्गदर्शन केले. इंडियन प्रीमियर लीगमध्ये त्यांनी खेळाडू आणि मार्गदर्शक म्हणून काम केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कोलकाता नाइट रायडर्स संघाने २०२४ मध्ये आयपीएलचे विजेतेपद मिळवले.

पाईल्सचा कायमचा उपाय ! वेदना, रक्तस्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जड्ड डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
काळे ज्वेलर्स
9601222777
9615222777
सोने | चांदी | हिरे | नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर



## कौठे मलकापूरलाच एमआयडीसी होणार - आ. खताळ


अधिकाऱ्यांसमवेत पहाणी करतांना आ. अमोल खताळ

**कौठे मलकापूर येथे प्रस्तावित एम आय डी सी साठी आवश्यक असलेले पाणी राखीव ठेवण्याचा शब्द राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिला आहे. त्यामुळे पाण्याबाबत काळजी करण्याचे कारण नाही. कौठे मलकापूर येथील प्रस्तावित औद्योगिक वसाहतीच्या उद्घाटनासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री यांना लवकरच आणणार आहे.**

**- आ. अमोल खताळ, संगमनेर**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील सर्वसामान्य जनतेने मला काम करण्याची संधी दिली आहे. त्यामुळे दिवस-रात्र जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी मी प्रयतनशील असून, सर्वसामान्यांचे प्रश्न मार्गी लावत विकासाच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. मात्र, एम आय डी सी घारगावला होणार, बोटा येथे होणार अशा वावड्या उठवून स्टंटबाजी करण्याचे काम काही जणांकडून सुरू आहे, असा टोला आमदार अमोल खताळ यांनी आमदार सत्यजित तांबे यांना लगावला. तसेच, कुणी कितीही प्रयत्न केले, तरी संगमनेरची एमआयडीसी कौठे मलकापूर येथेच होणार, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

संगमनेर तालुक्यातील बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात व औद्योगिक विकासाला चालना मिळावी, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने कवठे मलकापूर येथे प्रस्तावित कौठे मलकापूर येथील एम आय डी सी च्या जागेची आमदार खताळ यांनी पाहणी केली. यावेळी त्यांच्या समवेत महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ चे उप मुख्य कार्यकारी अधिकारी शंकर बर्गे अहिल्यानगरचे प्रादेशिक अधिकारी गणेश राठोड पुणे येथील कार्यकारी अभियंता संजय कोतवाड, अहिल्यानगरचे उप रचनाकार सुहास लाहोटी, सहाय्यक अभियंता राहुल बळी, प्रमुख भूमापक फुलचंद कातकडे, एकनाथ ठाकरे यांच्यासह महायुतीचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. खताळ म्हणाले, की संगमनेर मध्ये एम आय डी सी उभारण्याची आग्रही मागणी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार, उद्योग मंत्री उदय सामंत आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे वारंवार केली होती. संगमनेर येथे झालेल्या सभेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एम आय डी सी संगमनेरमध्येच होणार, असा शब्द दिला होता. त्यासाठी लागणारी जमीन देण्याची तयारी शेतकऱ्यांनी दाखवली आहे. त्यामुळे संगमनेर तालुक्याची एमआयडीसी ही कौठे मलकापूर येथेच होणार असल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले

संगमनेरच्या जनतेने तुम्हाला नाकारून घरी बसवले आहे. त्यामुळे तालुक्यात सुरू असलेल्या विकास कामांमध्ये विनाकारण अडथळे आणू नका. विकासकामांना विरोध केला तर हीच सर्वसामान्य जनता आगामी काळात तुम्हाला नक्कीच उत्तर देईल. असा इशारा देत ते म्हणाले की गेल्या चाळीस वर्षांत जे साध्य झाले नाही, ते एका सर्वसामान्य तरुणाला अवघ्या दीड वर्षात करून दाखविण्याची संधी मिळाली आहे. याचे शल्य काहींच्या मनात असल्याने त्यांच्याकडून अशी वक्तव्ये केली जात आहेत.

मात्र, विरोधकांनी कितीही प्रयत्न केले, तरी कौठे मलकापूर येथील एम आय डी सी चा निर्णय मार्गी लावण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत, असे सांगून कौठे मलकापूर येथील प्रस्तावित एमआयडीसी गुंतवणूक करण्यासाठी अनेक नामांकित कंपन्यांनी तयारी दर्शवली आहे. त्यामुळे परिसरातील तरुणांना रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वासही आमदार खताळ यांनी व्यक्त केला.

## जास्तीचे सोने देण्याचे आमिष
## फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश!


चार गुन्हे उघड, दोघे ताब्यात, ६.६० लाखांचे सोने जप्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर : जास्तीचे सोने देण्याचे आमिष दाखवून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. संगमनेर तालुक्यातील साकूर बसस्थानकावर महिलेचे मंगळसूत्र लंपास केल्याच्या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्या चौकशीत घारगाव, नेवासा, कोपरगाव आणि मिरजगाव येथील चार गुन्हे उघडकीस आले असून, ६ लाख ६० हजार रुपये किमतीचे ४४ ग्रॅम सोन्याचे लगड व दागिने जप्त करण्यात आले आहेत. या टोळीतील अन्य दोघे फरार असून, पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

३० सप्टेंबर २०२६ रोजी साकूर बसस्थानकावर राहुरी तालुक्यातील चिखलठाण येथील सोपान पोपट डोलनर यांच्या आईला तीन अनोळखी व्यक्तींनी विश्वासात घेऊन त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र काढून घेतले होते. याप्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने तपास सुरू केला. गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे ११ ऑक्टोबर रोजी बीड जिल्ह्यातील औरंगपूर येथील सचिन संजय गायकवाड याला पाठर्डी तालुक्यातील खरवंडी परिसरातून ताब्यात घेण्यात आले. त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे नाळवंडी नाका येथील संतोष मोहनराव चिंतामणी यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले.

दोघांच्या चौकशीत सोन्याचे दागिने किंवा अधिक सोने देण्याचे आमिष दाखवून नागरिकांची फसवणूक केल्याचे चार प्रकार समोर आले. या कारवाईत ४४ ग्रॅम सोन्याचे लगड व दागिने जप्त करण्यात आले असून, पुढील तपासासाठी दोन्ही संशयितांना मुद्देमालासह मिरजगाव पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे. शहादेव रामदास जाधव आणि आबा तुपे हे अन्य दोन संशयित अद्याप फरार आहेत.

ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली. सोन्याच्या व्यवहारात अधिक नफा मिळवून देण्याचे किंवा कमी किमतीत अधिक सोने देण्याचे आमिष दाखवणाऱ्या अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नये. खात्रीशीर पडताळणी केल्याशिवाय दागिने अथवा पैसे त्यांच्या ताब्यात देऊ नयेत, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह
### थोरातांसह काँग्रेस नेते दिल्लीच्या आंदोलनात




संगमनेर (प्रतिनिधी)

वोट चोरी करणाऱ्या केंद्र सरकार व यामध्ये मुख्य भूमिका असणारे देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा घ्यावा व चौकशी व्हावी. याकरता इंडिया आघाडीच्या वतीने आयोजित दिल्ली आंदोलनात काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्यासह महाराष्ट्रातील विविध नेते खासदार, आमदार, पदाधिकारी सहभागी झाले असून ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा घेतलाच पाहिजे अशी मागणी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली आहे. नवी दिल्ली येथे महाराष्ट्र सदन ते सर्वोच्च न्यायालय यादरम्यान झालेल्या आंदोलनामध्ये विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी, पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, खासदार प्रियंका गांधी, ममता बॅनर्जी, अखिलेश यादव, सुप्रिया सुळे, संजय राऊत यांच्यासह इंडिया आघाडीतील प्रमुख नेते व महाराष्ट्र काँग्रेस मधून माजी प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, नाना पटोले, खासदार वर्षा गायकवाड, आमदार बंटी पाटील, आमदार डॉ. विश्वजीत कदम, आमदार अमित देशमुख आमदार हेमंत ओगले, माणिकराव ठाकरे यांच्यासह विविध पदाधिकारी सहभागी झाले आहेत.

यावेळी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, सर्वोच्च न्यायालय हे न्याय मागण्यासाठी ची अंतिम जागा आहे. त्यांनी देशाचा आवाज ऐकून घेतला पाहिजे. इंडिया आघाडीचा आवाज हा देशाचा आवाज आहे मात्र सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश यांनी राहुल गांधी यांना भेटणार कारणे हे दुर्दैवी आहे. सत्ताधाऱ्यांनी जनतेचा आवाज ऐकला पाहिजे. परंतु ती त्यांची तयारी नाही .काँग्रेस सरकारच्या काळामध्ये अनेक आंदोलने झाली. सर्वांचा आवाज सरकारने ऐकला. पद्मभूषण अण्णा हजारे यांनी जंतर-मंतरवर आंदोलन केले. मुक्तपणे आंदोलन झाले .त्यामध्ये कोणताही दबाव नव्हता. मात्र दुर्दैवाने आज तसे होत नाही सध्याचे सत्ताधारी काहीही करून सत्ता हवी अशा पद्धतीने वागत असून सत्तेला चिटकून राहतात आणि जनतेचा आवाज दाबत आहेत. स्वायत्त संस्था स्वायत्त राहिलेल्या नाहीत. त्यांच्यावर राजकीय दबाव टाकला जात आहे. मीडिया हे स्वतंत्र असून ते सुद्धा सरकारच्या नियंत्रणाखाली काम करत आहे. जगामध्ये मीडियाच्या बाबत भारताचा १५७ वा नंबर लागतो हे वाईट आहे.

महाराष्ट्रात एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचे आंदोलन खूप दिवस झाले त्यांची न्याय मागणी होती. भिमनवार यांचे खरे तर निलंबन व्हायला हवे होते. पेपर का फुटतात की ठराविक लोकांसाठी फोडले जातात. आर्थिक घोटाळ्या बरोबर इतर काय लागेबंधे आहेत याची चौकशी झाली पाहिजे.

### सोमेश्वरवर सुनेत्रा पवारांचे वर्चस्व!

पुणे - बारामती तालुक्यातील अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील 'श्री सोमेश्वर विकासपुरुष अजितदादा पवार पॅनेल'ने दणदणीत विजय मिळवला आहे. विरोधकांचे सर्व मनसुबे उधळून लावत सुनेत्रा पवारांच्या पॅनेलने २१ पैकी २१ जागांवर बाजी मारत कारखान्यावर आपले एकछत्री वर्चस्व कायम ठेवले आहे.

रविवारी पार पडलेल्या ८४ टक्के मतदानानंतर सोमवारी मतमोजणी झाली. त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि राष्ट्रवादीतून बंडखोरी केलेले पुरुषोत्तम जगताप या दोन्ही विरोधी पॅनेलचे पूर्णपणे पानिपत झाले. कारखान्यावरील ऐतिहासिक विजयानंतर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार अत्यंत भावूक झाल्या.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
02425 - 224761, मोबा. 7038170382

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ | * कर्ज व्याजदर कमी | * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता




कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिश्रमनाय्
- सर्जरी विभाग
- डायलिसीस विभाग
- हृदयरोग विभाग
- जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- मेडिसीन विभाग
- स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग
- न्यूरोविभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25